# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२१

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये वर्ग जोडणीस मान्यता दिल्याबाबत

**(१) १७९३ (१८-०३-२०२०) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता चौथीपर्यंत असलेल्या ५ वी व ७ वी पर्यंतच्या शाळेस इयत्ता ८ वी चा वर्ग जोडण्यास शासनाने मान्यता दिल्याचे दिनांक २० ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नव्या निर्णयानुसार वर्ग जोडणीच्या अंमलबजावणीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२९-१२-२०२०) :** (१) दिनांक १९ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये इ.५ वी व इ.८ वी चा वर्ग जोडण्याबाबत सुधारित धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार शिक्षण संचालक (प्राथमिक)

यांच्याकडून तपासणी करून प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत या शासन निर्णयान्वये सूचित करण्यात आले आहे.
(२) सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई बेस्टच्या तिजोरीत नाणी वापराविना पडून असल्याबाबत

**(२) १८०३ (१८-०३-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई बेस्टच्या तिजोरीत १२ कोटी रुपयांची नाणी वापराविना असून उक्त नाणी नेण्यासाठी कंत्राट दिलेल्या कंपनीने सदर नाणी नेण्यास बेस्ट उपक्रमासमोर असमर्थता दर्शविल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नाणी ग्रामीण भागातील बँक ही स्वीकारत नसल्याने राज्यातील सर्व केंद्रीय व सहकारी बँकामध्ये सदर नाणी स्वीकारण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०१-२०२१) :** (१) सदर नाण्यांचा बँकेमार्फत उठाव न झाल्यामुळे माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यापर्यंत बेस्ट उपक्रमाच्या तिजोरीत १२ कोटी रुपयांची नाणी जमा झाली होती.

तथापि, बेस्ट उपक्रमाकडून दैनंदिन उत्पन्न बँकेत जमा करण्यासंबंधीची निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.
(२) व (३) दैनंदिन जमा होणारी नाणी स्वीकारण्यासाठी बेस्ट उपक्रमाकडून राष्ट्रीयकृत, सहकारी व खाजगी बँकांशी पत्रव्यवहार करण्यात आला.

तथापि, त्यांच्याकडून प्रतिसाद न आल्यामुळे रिझर्व्ह बँकेने दिनांक ०८/०१/२०२० रोजी काही बँकांच्या अधिकाऱ्यांबरोबर आयोजित केलेल्या बैठकीत बँकांना सुटी नाणी स्वीकारण्याबाबत निर्देशित केल्यानुसार काही बँकांनी रुपये २.३५ कोटीची नाणी स्वीकारली आहेत.

तसेच, नागरिक, विविध व्यवसाय संस्था, दुकाने इ. बरोबर संपर्क साधून त्यांना बेस्ट उपक्रमाच्या प्रत्येक आगारातून सुटी नाणी उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था केली असून, वर्तमानपत्रामधून देखील जाहीर आवाहन करण्यात आले आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील टोल कंत्राटदार, मुंबई एन्ट्री पॉईंट लि. यांनी रुपये २.१० कोटीची नाणी स्वीकारली आहेत.

तसेच, बेस्ट उपक्रमाच्या अधिकारी व सेवकवर्गाला त्यांच्या मासिक वेतनातून ठराविक रोख रक्कम नाण्यांच्या स्वरुपात देण्यात येत आहेत. याव्दारे एकूण रुपये ४१ कोटी इतकी रक्कम देण्यात आली असून, सदर व्यवस्था पुढेही सुरु ठेवण्यात येणार आहे.

---

## जोगेश्वरी (पूर्व), प्रतापनगर येथील राजेश्वर वामन रागिनवार हिंदू स्मशानभूमीच्या पुनर्बांधणीचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३) २९४१ (२९-०५-२०२०) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी (पूर्व), प्रतापनगर, जेव्हीएलआर मार्गालगत असलेल्या बृहन्मुंबई महापालिकेच्या राजेश्वर वामन रागिनवार हिंदू स्मशानभूमीच्या पुनर्बांधणीचे काम गत २ वर्षापासून अपूर्णावस्थेत असून उक्त स्मशानभूमीत महापालिकेने खरेदी केलेल्या लाखो रूपयांच्या धुराडाचे साहित्य गत ८ ते ९ महिन्यापासून विनावापर असून पावसाळयात पाणी लागल्यामुळे खराब होण्याची शक्यता निर्माण झाल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मशानभूमीचे काम कंत्राटदाराने दुर्लक्ष केल्याने अपूर्णावस्थेत असून अंत्यविधी जुन्याच शवदाहिनीवर उरकताना कामगारांसह अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरीकांना नाहक अनेक गैरसोयींचा सामना करावा लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर स्मशानभूमीच्या पुनर्बांधणीचे काम शीघ्रगतीने हाती घेऊन पूर्ण होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-०१-२०२१)** : (१) जोगेश्वरी (पूर्व) प्रतापनगर येथील राजेश्वर वामन रागिनवार हिंदू स्मशानभूमीच्या पुनर्बांधणीचे काम नोव्हेंबर, २०१८ पासून सुरु आहे हे खरे आहे.

तथापि, सदर स्मशानभूमीतील वायु प्रदूषण नियंत्रण यंत्रणेतील धुरांड्याचे साहित्य कार्यस्थळी आले असून ते सुस्थितीत आहे व धुरांडे बसविण्याचे काम प्रगतीपथावर असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) सदर स्मशानभूमीतील ४ पैकी २ शववाहिन्या बदलण्यात आल्या असून उर्वरित २ शववाहिन्या बदलण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

त्यामुळे सद्य:स्थितीत दोन जुन्या व दोन नव्या शववाहिन्या कार्यरत आहेत.
(३) व (४) दिनांक २४ मार्च, २०२० पासून कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे स्मशानभूमीवर लॉकडाऊन घोषित केल्यामुळे सदरचे काम होते.

तथापि, कोरोना प्रादुर्भावामुळे स्मशानभूमीवर आलेल्या कामाचा ताण पाहता, वायु प्रदूषण नियंत्रण यंत्रणेचे उर्वरित काम त्वरित सुरु करुन वायु प्रदूषण नियंत्रण यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत व उर्वरित शववाहिन्या बदलण्याबाबत कंत्राटदारास आदेश देण्यात आले असून, सदर काम त्वरित पूर्ण करुन घेण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

# मुलुंड पश्चिमेकडील लालवाणी मार्गावरील 'योगेश्वर कृपा' इमारत धोकादायक व असुरक्षित असल्याबाबत

**(४) ३००७ (०३-०६-२०२०) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलुंड पश्चिमेकडील लालवाणी मार्गावरील सुमारे ४० वर्षे जुनी असलेली "योगेश्वर कृपा"' ही इमारत धोकादायक व असुरक्षित असल्याचे निष्पन्न झाल्यानंतरही सदरहू इमारतीत दुसऱ्या मजल्यावर वास्तव्यास असलेल्या एका सदस्याला बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'टी' वार्डच्या अधिकाऱ्याने अनधिकृतरित्या दुरुस्तीची परवानगी दिल्यामुळे उक्त इमारतीतील अन्य रहिवाश्यांचे जीव धोक्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परवानगी केवळ प्लास्टर मुलामा देण्याबाबत असून उक्त सदस्य अनधिकृतपणे तोडफोडकरीत असल्यामुळे अधिच मोडकळीस आलेली इमारत कोसळण्याची भिती निर्माण झाली असून ई-स्ट्रक्चरल कन्सल्टन्सी प्रा.लि. यांच्यातर्फे करण्यात आलेल्या स्ट्रक्चर ऑडिटनुसार ह्या इमारतीचा सी-१ श्रेणीत समावेश करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त इमारत ४० वर्षे जुनी असून इमारतीच्या आरसीसी कॉलम, बीम तसेच स्लॅबला तडे गेले असल्यामुळे कुठलेही नवे बांधकाम करण्यास मनाई असल्याची रितसर नोटीस २४ जुलै, २०१७ रोजी टी वार्डचे सहाय्यक अभियंता (इमारत/कारखाने) यांच्याकडून बजावण्यात आली असूनही सदर वार्डच्या सहाय्यक पालिका आयुक्तांनी नवीन भाडेकरूस प्लास्टर करण्याची तोंडी परवानगी दिली असल्याचा आरोप ऑकिटेक्ट श्री.संजय आयरे यांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सदर इमारतीमधील नागरिकांसोबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने विभाग कार्यालयामध्ये सभा घेतली असता मेसर्स ई-स्ट्रक्ट कन्सल्टन्सी प्रा.लि. यांनी तयार केलेला लेखापरिक्षण अहवाल दिनांक २०/०२/२०२० रोजी सादर करण्यात आला. या अहवालानुसार सदर इमारत सी-१ श्रेणी इमारत असल्याचे म्हटले आहे.

महानगरपालिकेच्या धोरणानुसार सदर इमारतीचे मालक व भाडेकरु यांना एक महिन्याच्या आत सूचना/आक्षेप असल्यास या कार्यालयास अवगत करण्याबाबत दिनांक ०२/०३/२०२० रोजी पत्र देण्यात आले. त्यानुसार एकही सूचना/आक्षेप प्राप्त झालेली नाही. दरम्यानच्या काळात कोविड-१९ ची साथ व लॉकडाऊन इ. सर्व बाबींमुळे सदर इमारत सी-१ धोकादायक इमारत म्हणून घोषित करण्याची कार्यवाही पूर्ण करता येऊ शकली नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व) येथे परिपूर्ण अग्निशमन केंद्र व अद्ययावत प्रशिक्षण केंद्र उभारण्याबाबत

**(५) ३०४८ (०३-०६-२०२०) श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक ८२९ ला दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व) येथे सन २०१८ पासून लघु अग्निशमन केंद्र कार्यान्वित असून या ठिकाणी परिपूर्ण अग्निशमन केंद्र व अद्ययावत प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय असून उक्त ठिकाणी परिपूर्ण अग्निशमन केंद्र व अद्ययावत प्रशिक्षण केंद्र उभारण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे तसेच अग्निशमन केंद्र कार्यान्वित होण्यास किती कालावधी अपेक्षित आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व) या ठिकाणी सद्य:स्थितीत लघुअग्निशमन केंद्र सन २०१८ पासून कार्यान्वित आहे.

तसेच, सदर ठिकाणी सुसज्ज अग्निशमन केंद्र उभारणीसाठी निविदा काढण्याची प्रक्रिया पूर्णत्वास आली असून, सदर अग्निशमन केंद्र उभारणीकरीता प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली आहे.

मुंबई शहरामध्ये कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनच्या अनुषंगाने सदर प्रकरणी स्थायी समितीची मंजुरी प्राप्त होऊ शकलेली नाही. स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाल्यावर निविदाकारास कार्यादेश निर्गमित करुन प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## राज्यातील कोरोना विलगीकरण कक्षात विविध सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(६) ३१३१ (२९-०५-२०२०) श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कोरोनाचा सामना करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या विलगीकरण कक्षात विविध मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विलगीकरण कक्षात पिण्याचे पाणी, अस्वच्छ स्वच्छतागृहे, अस्वच्छ बेडशीट यासारख्या अनेक समस्यांमुळे संशयित रुग्णांना अडचणी येत असल्याने कोरोनाचा धोका वाढल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२७-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) राज्यात सध्या २८२ विशेष कोविड रुग्णालय (DCH), ४३२ विशेष कोविड आरोग्य केंद्र (DCHc), १६१९ कोविड निगा केंद्र (CCC) कार्यरत आहेत. याशिवाय आणखी १९७ रुग्णालये तयार ठेवण्यात आलेली आहेत. याप्रमाणे राज्यात सध्या २५३० रुग्णालये कोविड रुग्णांच्या उपचारासाठी तयार असून, त्याठिकाणी २,९०,९१४ खाटांची सोय करण्यात आली आहे. या सर्व रुग्णालयांमध्ये मूलभूत सुविधा पुरेश्या प्रमाणात व्हेंटिलेटर्स, पी.पी.ई. किट आणि एन-९५ मास्क उपलब्ध आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हुमन नदी (ता.सिंदेवाडी, जि.चंद्रपूर) प्रकल्पाच्या कामाला सुरुवात करण्याबाबत

**(७) ३१७३ (२९-०५-२०२०) श्री.रामदास आंबटकर : तारांकित प्रश्न क्रमांक २६२ ला दिनांक २५ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हुमन नदी (ता.सिंदेवाही, जि.चंद्रपूर) येथे हुमन प्रकल्पाला सन १९८३ मध्ये शासनाने मान्यता देवून ३६ वर्षाचा कालावधी उलटूनही सदर प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झाली नसल्याचे दिनांक १३ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाला वन व पर्यावरण विभागाने मान्यता देवून मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महसूल विभागाने वन विभागाला वर्धा व चंद्रपूर जिल्ह्यात पर्यायी जमीन उपलब्ध करून देवून दिनांक १ डिसेंबर, २०१६ रोजी नऊ सदस्यांची समिती स्थापन केली असून सदर समितीची एकही बैठक घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण झाल्यास जंगलातील प्राण्यांना, चंद्रपूर जिल्ह्यातील मूल, पोंभूर्णा व चंद्रपूर तालुक्यातील शेतकऱ्यांना फायदा होवून ४६ हजार हेक्टर शेतजमीन सिंचनाखाली येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रकल्पाच्या कामाला सुरुवात करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२५-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.

सन १९८२-१९८३ ते १९८४-१९८५ या कालावधीत उपधरण, पोचमार्ग व इमारती इ. प्राथमिक स्वरुपाची कामे करण्यात आली. वन कायदा १९८० अंतर्गत वन जमिनीची अंतिम मान्यता नसल्याने सन १९८४-१९८५ पासून प्रकल्पाची कामे बंद आहेत.

(२) नाही.

दिनांक ०१/१२/२०१६ अन्वये गठीत करण्यात आलेल्या तज्ञ समितीची बैठक प्रधान सचिव (वने) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०५/०३/२०१९ व दिनांक १३/०१/२०२० रोजी संपन्न झाली असून दिनांक २४/०१/२०२० रोजी मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झालेली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २४/०१/२०२० रोजीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे पोयसर, कांदिवली (पुर्व), मुंबई येथील झोपडीधारकांच्या झोपड्या विकास नियोजित (डी.पी.) रस्ता नागरिकांसाठी खुला करणेबाबत

**(८) ३२७५ (०३-०६-२०२०) श्री.रामदास कदम :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली पुर्व (मुंबई) मौजे पोयसर, न.भु.क्र. ७५९ गायत्री नगर सहकारी गृहनिर्माण संस्था येथील झोपडीधारकांच्या झोपड्या बृहन्मुंबई विकास आराखड्यानुसार (डी.पी.) रस्त्यामध्ये जात असल्याने नागरिकांसाठी रस्ता खुला करुन सदर रस्त्यांमध्ये बाधित पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करणेबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे दिनांक १८ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार केला आहे, हे खरे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर रस्ता नागरिकांसाठी खुला करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) विकास नियोजन आराखड्यात दर्शविलेल्या प्रस्तावित रस्त्याचा भाग न.भु.क्र. ७५९ मौजे पोयसर या भूखंडामधून जात असून, सदर भूखंडावर गायत्री नगर सहकारी संस्था, ठाकूर संकुल, कांदिवली (पूर्व) ही झोपडपट्टी स्थित आहे.

तसेच, सन २००९ पासून सदर ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रस्तावित असून, विकास नियोजित रस्त्यातील बाधित झोपडीधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या अनुषंगाने प्रत्यक्ष जागेवर झोपडीधारकांचा अधिवास आहे किंवा कसे याची खातरजमा करण्याचे काम दिनांक १३/०३/२०२० पासून सुरु होते.

तथापि, कोविड-१९ च्या अनुषंगाने लॉकडाऊन घोषित करण्यात आल्याने सदर कार्यवाही प्रलंबित असून, लॉकडाऊन संपल्यानंतर याबाबत पुढील कार्यवाही प्राधान्याने करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## राज्यात आपत्कालीन सेवा देणाऱ्या शिक्षकांना पीपीई कीट व विमा संरक्षण देण्याबाबत

**(९) ३३०१ (०२-०६-२०२०) श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.किशोर दराडे, श्री.सुरेश धस, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.निलय नाईक, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनाग्रस्तांचा सर्व्हेक्षण करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची नियुक्ती केली असून रोगाच्या पार्श्वभूमीवर घरोघरी जाऊन नागरिकांच्या आरोग्याची तपासणी करण्याचे काम सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना व्हायरस या जागतिक महामारीची साथ पसरल्याने आपत्कालीन सेवेत असलेल्या इतर विभागातील कर्मचाऱ्यांना ५० लाखाचे विमा संरक्षण देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नगरपंचायत, नगरपालिका व महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांसह आपत्कालीन सेवा देणाऱ्या शिक्षकांना विमा संरक्षण देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आपला व कुटुंबाचा जीव धोक्यात घालून आपत्कालीन परिस्थितीत काम करणाऱ्या नगरपंचायती, नगरपालिका व महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांसह सेवा देणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पीपीई कीट उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच ५० लाखाचे विमा संरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२७-०१-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यामध्ये कोरोनाग्रस्त भागाच्या सर्वेक्षणासाठी तसेच कोरोना प्रतिबंध व नियंत्रणा संदर्भातील इतर उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी काही जिल्ह्यांमध्ये शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मदत घेण्यात येत आहे.

(२) हे खरे आहे.

प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज योजनेंतर्गत कोविड आजाराच्या तपासणी आणि उपचार या संदर्भातील सेवा देणाऱ्या डॉक्टर्स, नर्सेस आणि इतर रुग्णसेवक आणि संबंधितांना ५० लाखाचे विमा संरक्षण देण्यात आले आहे.

(३) प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज योजनेंतर्गत देण्यात येणारे सदर विमा संरक्षण कोविड बाधेवर तपासणी व उपचार करणाऱ्या सर्व संबंधितांना अनुज्ञेय आहे. यामध्ये खाजगी रुग्णालयांचे कर्मचारी/सेवा निवृत्त कर्मचारी/कंत्राटी कर्मचारी/रोजंदारी वरील कर्मचारी/बाह्ययंत्रणेव्दारे उपलब्ध करुन घेतलेले कर्मचारी, आशा अंगणवाडी कर्मचारी केंद्र/राज्य/स्थानिक स्वराज्य संस्था इ. सर्व प्रकारची कार्यालये येथे कार्यरत कर्मचारी यांचा समावेश आहे.

(४) कोविड सर्वेक्षण तपासणी व उपचार अशा विविध कामात सहभागी असणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाच्या स्वरुपानुसार आवश्यक वैयक्तिक संरक्षण साधने पी.पी.ई. किट, एन-९५ मास्क अथवा ट्रिपल लेयर सर्जिकल मास्क पुरेशा प्रमाणात पुरविण्यात येत आहेत.

तसेच आरोग्य कर्मचाऱ्याव्यतिरिक्त कोरोनाच्या सार्वत्रिक साथीमध्ये सर्वेक्षण, शोध, माग काढणे, प्रतिबंध, चाचणी, उपचार व मदत कार्य यांचेशी संबंधित कर्तव्य बजावित असताना कर्मचाऱ्याचा दुर्दैवाने मृत्यू झाल्यास आपत्कालीन सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी वित्त विभागाने दिनांक २९/०५/२०२० रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार या कर्मचाऱ्यांना ५० लाखाचे विमा संरक्षण/सानुग्रह अनुज्ञेय करण्यात आले आहे.

तसेच कोविड बाधेवर तपासणी व उपचार करणाऱ्या सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना रुपये ५० लाखाचे विमा संरक्षण लागू आहे. दिनांक २५ जुलै, २०२० अखेर कोविड आजाराने मृत्यूमुखी पडलेल्या ३ आरोग्य कर्मचाऱ्यांचे विमा संरक्षण विषयक प्रस्ताव मान्य करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोरोनाविरूध्द डॉक्टर, नर्स, पोलीस, सफाई कामगार व शिक्षक यांना अधिकचे वेतन देण्याबाबत

**(१०) ३३६० (२९-०५-२०२०) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनाविरूध्द लढणाऱ्या सार्वजनिक आरोग्य विभागातील डॉक्टर, नर्स, पोलीस, सफाई कामगार व शिक्षक यांना अधिकचे वेतन देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या निर्णयाचे स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२७-०१-२०२१) :** (१) सार्वजनिक आरोग्य विभागाने असा निर्णय घेतलेला नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील प्रकल्पांच्या दुरूस्तीकरीता निधीची तरतूद करण्याबाबत

**(११) ३५७१ (०२-०६-२०२०) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील पाटबंधारे विभागाच्या धरणातून पाटबंधारे योजनासह इतर प्रकल्प योजनांच्या माध्यमांतून तीन हजार हेक्टरपेक्षा जास्त जमीन सिंचनाखाली येत असून जिल्ह्यातील उद्योग समूहांना तसेच गावांना पिण्याचे पाणी पुरविले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड पाटबंधारे विभागाच्या अखत्यारित येत असलेल्या सर्व धरणातून शासनाला प्रतिवर्षी रुपये ११० कोटींचा महसूल मिळत असून गेल्या १० वर्षांपासून या प्रकल्पांच्या दुरूस्तीकरीता कोणतीही आर्थिक तरतूद करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकल्पांच्या दुरूस्तीसाठी निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२१-०१-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

रायगड जिल्हयातील प्रकल्पातून शासनाला दरवर्षी रुपये ११० कोटी महसूल प्राप्त होत आहे. शासन निर्णय, दिनांक १७/११/२०१६ पूर्वी शासनस्तरावरून प्रकल्पांच्या दुरुस्तीकरीता आवश्यकतेप्रमाणे निधी प्राप्त झालेला आहे व तद्नंतर महामंडळास प्राप्त होणाऱ्या सिंचन पाणीपट्टीतून प्रकल्पांच्या नियमित देखभाल व दुरुस्तीकरीता निधी प्राप्त होत आहे. सन २०१९-२०२० साठी ३५.८३ कोटी निधी देखभाल व दुरुस्तीची कामे करण्याचे नियोजित आहे. यामध्ये काळ मोठा प्रकल्प, राजानाला सिंचन समूह व जिल्हयातील इतर राज्यस्तरीय लघु प्रकल्पांचे देखभाल व दुरुस्ती कामांचा समावेश आहे.
(३) दुरुस्तीसाठी आवश्यक निधी महामंडळाकडून प्राप्त होत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अक्सर, दहिसर येथील महानगरपालिकेच्या मालकीचा राखीव भूखंड संपादन करण्यास विलंब होत असल्याबाबत

**(१२) ३५८३ (१६-०७-२०२०) श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २६११ ला दिनांक १८ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दहिसर येथील अक्सर गावात मुंबई महानगरपालिकेच्या मालकीचा ३२ हजार ३९४.९० चौरस मीटरचा भूखंड उद्यान, रुग्णालय, खेळाचे मैदान, प्रसुतिगृह, दवाखाना आणि रस्ता बांधण्याचे दृष्टीने राखीव ठेवण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंडाच्या अनुषंगाने मे.निशल्प रिअॅलिटीस प्रा.लि. यांनी दिनांक २७ डिसेंबर, २०१० रोजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२७ अन्वये खरेदी सूचनेच्या अनुषंगाने भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करुन उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्रमांक ७ यांनी दिनांक १५ फेब्रुवारी, २०२० रोजी अंतिम निवाडा जाहीर केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर भूखंडाचे संपादन करण्यात कसूर केल्याप्रकरणी दोषींविरोधात कारवाई करुन भूखंडाचे विनाविलंब संपादन होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-११-२०२०) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या “आर” विभागाच्या मंजूर विकास आराखडा १९९१ नुसार एक्सर गाव येथील न.भ.क्र.८२८, ८५७ व ८६७ हे भूखंड उद्यान, हॉस्पिटल, खेळाचे मैदान, प्रसुतिगृह व दवाखाना आणि १८.३० मी. १३.४० मी. रुंद विकास नियोजन रस्ता या सार्वजनिक उद्दिष्टांकरीता आरक्षित असून, सदर भूखंडाचे क्षेत्रफळ ३२,३९४.९० चौ.मी. इतके आहे.

सदर भूखंडाची भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झाली असून, बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर भूखंडाचा ताबा दिनांक २८/०२/२०२० रोजी घेतला असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) सदर भूखंडासाठी मेसर्स निशल्प रिअॅलिटीस प्रा.लि. यांनी दिनांक २७/१२/२०१० रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना बजावली होती.
(३) सदर भूखंडाच्या भूसंपादनाची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पूर्ण करण्यात आली आहे.

---

## दोडा मार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील धरणाच्या उजव्या डाव्या कालव्याच्या दुरूस्तीबाबत

**(१३) ३६४० (०२-०६-२०२०) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोडा मार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात सन २०१९ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे तिलारी धरण परिसरात अनेक ठिकाणी डोंगर खचणे, धरणाच्या डाव्या उजव्या कालव्यात बांधकाम कोसळून, तसेच तेरवण मेढे धरणाच्या उजव्या कालव्यात तेरवण तिलारी, भटवाडी, घोटगेवाडी, परमे, चोपडे, वानोशी, कुडासा, लायनिंग बांधकाम तसेच घळणीचा भाग कोसळून नुकसान झाले असतानाही धरणाच्या उजव्या डाव्या कालव्याच्या दुरूस्तीबाबत जलसंपदा विभागाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोसळलेल्या बांधकामाच्या दुरूस्तीचे काम हाती न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, दुरूस्तीचे काम हाती न घेतल्यामुळे येत्या पावसाळयात पुन्हा उर्वरित भाग कोसळून कालवे गाळाने भरण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू कोसळलेल्या बांधकामाच्या दुरूस्तीचे काम विनाविलंब हाती घेऊन पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (१३-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.

सदर कालव्यामध्ये जमा झालेली डोंगरमाती व पावसामुळे आलेला गाळ यांत्रिकी विभागाकडून साफसफाईचे कामे पूर्ण करुन कालव्याव्दारे सन २०१९-२०२० च्या हंगामामध्ये पाणी सोडण्यात आले आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

सदर प्रकल्प हा गोवा व महाराष्ट्र राज्याचा संयुक्त प्रकल्प आहे. सामायिक कामांची (Common Work) दुरुस्तीची कामे करण्यापूर्वी गोवा व महाराष्ट्र राज्याची संयुक्त पाहणीनंतर दोन्ही राज्यांची मंजुरी मिळाल्यानंतर त्याप्रमाणे कामे हाती घेऊन दुरुस्ती करण्यात येते.

(३) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत अशी परिस्थिती निर्माण झालेली नाही.

(४) मागील वर्षामध्ये अतिवृष्टीमुळे आलेला गाळ विनाविलंब यांत्रिकी यंत्रणेमार्फत काढून कालवा प्रवाहीत करण्यात आला. ज्या ठिकाणी भविष्यात भूस्खलन होण्याची शक्यता आहे. अशा भागांची पाहणी भूवैज्ञानिकांच्या मार्फत करुन कायमस्वरुपी उपाययोजनांची अंदाजपत्रके तयार करण्यात आली असून याबाबत गोवा राज्याकडून निधीची मागणी केली आहे. निधी उपलब्ध होताच कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मंगळवेढा ते ब्रम्हपुरी (जि.सोलापूर) राष्ट्रीय महामार्गाचे कामात जमीन संपादीत केलेल्या शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत

**(१४) ३६६८ (०३-०६-२०२०) श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा ते ब्रम्हपुरी (जि.सोलापूर) या राष्ट्रीय महामार्गाचे काम बीडकॉन कंपनीमार्फत चालू असून सदर राष्ट्रीय महामार्गासाठी शेतजमीन संपादित केलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकरी व कंपनी कर्मचारी यांच्यात वारंवार वाद होत असल्यामुळे कंपनीला पोलीस बंदोबस्त घेऊन उक्त काम करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शेतकऱ्यांना त्यांच्या शेत जमिनीचा योग्य मावेजा तात्काळ मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२२-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही. संबंधित शेतकऱ्यांचे संपादित क्षेत्राचे राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ मधील तरतुदीनुसार योग्य त्या मोबदल्याचे निवाडे जाहीर करण्यात आलेले आहेत. तथापि, त्यातील काही क्षेत्राबाबत, मालकी हक्काबाबत तक्रार असल्याने व सदर तक्रारीबाबत उच्च न्यायालयात दावा दाखल असून त्यात मोबदला वाटपाच्या रक्कमेबाबत स्थगिती आदेश असल्याने संबंधित शेतकऱ्यांना मोबदला वाटपाचे कामकाज स्थगित आहे.
(२) अंशतः खरे आहे.

बाधित शेतकरी व कंपनी यांचेमध्ये वाद झालेवेळी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून पोलीस बंदोबस्त घेण्यात येऊन राष्ट्रीय महामार्गाचे कामकाज प्रगती पथावर आहे. दैनंदिन पोलीस बंदोबस्त लागत नाही.
(३) म.हुसेन खुर्शीद अहमद काझी व इ. यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन २६६३/२०२०, २६६५/२०२०, २६७७/२०२०, २६७८/२०२०, २६८३/२०२०, २६८७/२०२० दाखल केलेल्या असून सदर याचिकेतील जमिनीचा मोबदला वाटप करणेबाबत स्थगिती आदेश मा.उच्च न्यायालयाने दिलेला आहे. सदरची बाब सध्या न्यायप्रविष्ट असल्याने वादातील जमिनीचे मोबदला वाटप करण्याचे काम सध्या स्थगित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खाजगी रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका व कर्मचाऱ्यांना पीपीई किट उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१५) ३७४० (०२-०६-२०२०) श्री.विजय उर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) गणेश पेठ (जि.पुणे) येथील एका खाजगी रुग्णालयातील परिचारिकेने सुरक्षा किट्सची मागणी केली असता डॉक्टरांनी तिला नोकरीवरून काढून टाकण्याची धमकी दिली असल्याचा एका चित्रफितीच्या (व्हिडिओ) माध्यमातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक रुग्णालयामध्ये कोरोना बाधित किंवा संशयित रुग्णांच्या संपर्कात येणाऱ्या डॉक्टर, परिचारिका व कर्मचाऱ्यांना पीपीई किट्स घालणे आवश्यक असतानाही गाऊन आणि मास्क घालून काम करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने धमकी देणाऱ्या डॉक्टरांवर कारवाई करुन कोरोना बाधित किंवा संशयित रुग्णांच्या संपर्कात येणाऱ्या डॉक्टर, परिचारिका व कर्मचाऱ्यांना पीपीई किट्स उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२७-०१-२०२१) :** (१) प्राप्त अहवालानुसार याबाबतची कोणतीही तक्रार पुणे महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाही.

(२) हे खरे नाही.

पीपीई किट वापराबाबतच्या मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाने दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे आंतररुग्ण विभागात दाखल असलेल्या रुग्णाच्या संपर्कात असणाऱ्या डॉक्टर, परिचारिका व कर्मचाऱ्यांकडून रिस्कच्या प्रकारानुसार पीपीई किटचा किंवा एन-९५ मास्क व ग्लोजचा वापर करण्यात येत आहे. तसेच, संशयित रुग्णाच्या संपर्कात येणाऱ्या डॉक्टर, परिचारिका व कर्मचाऱ्यांकडून एन-९५ मास्क, ग्लोजचा वापर करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

# मुंबई महानगरपालिकेने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर केलेल्या साहित्य खरेदीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१६) ४०९३ (१६-०७-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर खरेदी केलेल्या वैद्यकीय वस्तू तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठीच्या साहित्य खरेदीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनाग्रस्त रुग्णाचा मृत्यू झाल्यानंतर मृतदेह गुंडाळण्यासाठी मिळणारी बॉडी बॅग बाजारात किरकोळ ५०० ते १४०० रुपयांना मिळत असतानाही सदर बॉडी बॅग ६७०० रुपये म्हणजे बाजारभावापेक्षा पाच पट जास्त दराने खरेदी केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना काळात प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून खरेदी करण्यात आलेले मास्क, सॅनिटायझर, निर्जंतुकीकरण यंत्र, खाटा, विलगीकरण केंद्रांची बांधणी, थर्मामीटर पल्स-ऑक्सीमिटर, जेवण, धान्य वाटप या सर्वच बाबी चढत्या दराने खरेदी करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने उच्चस्तरीय चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे मृत्यूच्या प्रमाणात वाढ झाल्यावर कोरोनाग्रस्त रुग्णांचे शव गुंडाळण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पिशव्यांच्या खरेदीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत स्वारस्याची अभिव्यक्ती मागविण्यात आली होती.

सदर स्वारस्याची अभिव्यक्तीसाठी मार्गदर्शक तत्वानुसार केवळ एक पुरवठादाराचा नमुदा प्रतिसादात्मक ठरला असून, सदर पुरवठादाराकडून कोरोनाग्रस्त रुग्णांचे शव गुंडाळण्यासाठी आवश्यक असलेल्या पिशव्या रुपये ६७१९/- प्रति या दराने खरेदी करण्यात आल्या आहेत.

सदर पिशव्यांचा जीईएम पोर्टलवरील दर हा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या खरेदी दरापेक्षा एक ते दीड हजारांनी जास्त असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव/संसर्ग होऊ नये याकरीता तातडीने आपत्कालीन व्यवस्थापन करण्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या दिनांक १७/०३/२०२० रोजीचे परिपत्रक व स्थायी समितीला सादर करण्यात आलेल्या निवेदनातील निर्देशित पध्दतीप्रमाणे एक विशेष बाब म्हणून अल्प कालावधीच्या रोटेशन पध्दतीप्रमाणे साहित्यांची खरेदी करण्यात आली आहे.

सदर साहित्यापैकी सॅनिटायझर व एन-९५ मास्कची खरेदी महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या दरपत्रिकेनुसार करण्यात आली आहे.

तसेच, कापडी मास्क, निर्जंतुकीकरण यंत्र, खाटा, विलगीकरण केंद्राची बांधणी, थर्मामीटर, पल्स-ऑक्सीमीटर, जेवण या बाबी महानगरपालिकेच्या दिनांक १७/०३/२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये उपलब्ध बाजारभावाप्रमाणे खरेदी करण्यात आली होती.

सदर प्रक्रिया लॉकडाऊनमध्ये झाली असल्याने या कालावधीत बाजारभावामधील दरातील चढउतारामुळे त्या-त्या वेळी उपलब्ध दराप्रमाणे करण्यात आली असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरात बेकायदेशीर सावकारी कर्ज देवून सर्वसामान्य जनतेची फसवणूक केल्याबाबत

**(१७) ४१६२ (१४-०९-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना आणि टाळेबंदीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या गोरगरिबांना राहते घर, हातगाड्या, सायकली, सोन्याची वस्तू गहाण ठेवून तात्काळ सावकारी कर्ज देऊन त्यांची लूट करण्याचे प्रकार मुंबईतील कुर्ला, मानखुर्द, गोवंडी, मालवणी व धारावी या भागामध्ये सुरु असल्याची बाब माहे जून, २०२० च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मुंबई शहरात बेकायदेशीर सावकारी कर्ज देवून सर्वसामान्य जनतेची फसवणूक करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (२१-०१-२०२१) :** (१) नाही.

(२) मुंबई विभागात अवैध सावकारीबाबत एकूण २७ तक्रार अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी २१ तक्रारीत तथ्य आढळून न आल्याने सदर तक्रारी खारीज करण्यात आल्या आहेत. २ तक्रार अर्जांवर महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ चे कलम १६ अन्वये चौकशी करुन संबंधित सावकारांवर एफ.आय.आर. दाखल करण्यात आले आहेत व १ तक्रार अर्जावर महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ चे कलम १८(२) अन्वये कार्यवाही करुन संबंधित तक्रारदारास त्यांची मालमत्ता परत करण्यात आली आहे. उर्वरीत ३ तक्रार अर्जांवर अधिनियमाच्या तरतूदीनुसार कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील विनापरवाना सुरु असलेल्या उपहारगृहांना सील करण्याचे अधिकार महानगरपालिका अधिकाऱ्यांना मिळण्याबाबत

**(१८) ४१६६ (१७-०७-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत एखादे उपहारगृह विनापरवाना सुरू असल्यास त्याला तात्काळ सील करण्याचे अधिकार सध्याच्या कायद्याप्रमाणे मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना नसल्याने मुंबईत अनेक विनापरवाना उपहारगृहे सुरु असल्याची बाब माहे जून, २०२० च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनधिकृत उपहारगृहे ज्या इमारतीत आहे त्या इमारतीतील रहिवाशांचा विचार करता वीज व पाणी जोडणी तोडणेही व्यवहार्य ठरत नसल्यामुळे सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेल्या कायद्याप्रमाणे मुंबई महानगरपालिका अधिकाऱ्यांना केवळ उपहारगृहामधील टेबल-खुर्च्या व तत्सम साहित्य जप्त करता येत असल्याने उक्त अनधिकृत उपहारगृह चालविणाऱ्यांवर वचक बसत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील विनापरवाना सुरु असलेल्या उपहारगृहांना तात्काळ सील ठोकण्याचे अधिकार मुंबई महानगरपालिका अधिकाऱ्यांना मिळण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यात आवश्यक ते बदल करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१८-०१-२०२१) :** (१) कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर दिनांक २३ मार्च, २०२० पासून पूर्णत: लॉकडाऊन असल्यामुळे हॉटेल, रेस्टॉरन्ट बंद होते. तथापि, अत्यावश्यक सेवेतील डॉक्टर्स, अधिकारी, कर्मचारी हे त्यांच्या कार्यालयापासून बऱ्याच अंतरावर राहत असल्याने व त्यांना प्रवासासाठी सोयी उपलब्ध नसल्याने त्यांच्या कार्यस्थळाच्या आजूबाजूच्या हॉटेल व लॉजमध्ये महानगरपालिकेच्या खर्चाने सदर कर्मचाऱ्यांना राहण्याकरीता सोय उपलब्ध करुन देण्यात आली होती.

तसेच, कोविड-१९ ची सौम्य लक्षणे असलेल्या व लक्षणे नसलेल्या रुग्णांनाही क्वारंटाईन करण्याकरीता कोविड केअर सेंटर-२ (CCC-२) असलेल्या हॉटेलमध्ये ठेवण्यात आले होते.

(२) बहुतांश वेळा उपाहारगृहाची वीज व पाणी जोडणी स्वतंत्र असल्याने अनधिकृत व्यवसायाचा वीज व पाणीपुरवठा बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खंडीत करण्यात येतो.

तसेच विनापरवाना उपाहारगृह सुरु असल्यास संबंधित विभागाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचेमार्फत सदर व्यवसायास पाहणी अहवाल देऊन न्यायालयीन कारवाई करण्यात येऊन वेळोवेळी जप्तीची कारवाई करण्यात येते.

तसेच, संबंधित सहाय्यक आयुक्तांमार्फत स्थानिक पोलिसांच्या मदतीने उपाहारगृह सील करण्याची कारवाई करण्यात येते.

(३) मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३९४ मधील अनुसूची “म” भाग “४” मध्ये समाविष्ट असलेल्या व्यवसायांना बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून स्वच्छता व आरोग्याच्या अटींच्या पुर्ततेसापेक्ष अनुज्ञापत्र देण्यात येते.

तथापि, मुंबईतील विनापरवाना सुरु असलेल्या उपाहारगृहांना तात्काळ सील ठोकण्याचे अधिकार मिळण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यात आवश्यक ते बदल करण्याबाबत सद्य:स्थितीत कोणतीही कार्यवाही प्रस्ताविण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य अभियानांतर्गत तालुकास्तरावर गरीब रुग्णांवर उपचार होण्याबाबत

**(१९) ४२०३ (०९-०९-२०२०) डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृत्रिम सांधा रोपणाची शस्त्रक्रिया केवळ शासकीय रुग्णालयात करण्याची मुभा देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शासकीय दवाखान्यात सांधा रोपणाचे शस्त्रक्रियागार (ऑपरेशन थेटर) सुसज्ज नसेल तर तेथे खाजगी रुग्णालयास परवानगी देण्यात येणार आहे काय,

(२) असल्यास, महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य अभियानांतर्गत प्रत्येक तालुकास्तरावर गरीब रुग्णांना उपचार मिळावा यासाठी खाजगी रुग्णालयाच्या नोंदीचे लक्षाक वाढवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे व या निर्णयामुळे किती रुग्णालये तालुकास्तरावर नोंदणीकृत झाले आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२७-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.

सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया शासकीय व नगरपालिका, महानगरपालिका रुग्णालयासाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. तसेच एमसीआय मान्यता प्राप्त पीजी पदवी असलेल्या खाजगी वैद्यकीय महाविद्यालये यांचेसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

(२) Laminar flow व इतर बाबींची पूर्तता केल्यावर शासकीय व नगरपालिका तसेच महानगरपालिका रुग्णालयांना सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्याची परवानगी देण्यात येते.

(३) हे खरे आहे.

शासन निर्णय, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ अन्वये प्रत्येक तालुक्यात किमान २ रुग्णालये अंगीकृत करण्याचा निर्णय घेण्यात आला असून ३५८ तालुक्यापैकी १९८ तालुक्यात ९८२ रुग्णालये अंगीकृत करण्यात आली आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई येथील विविध भागातील वस्त्यांना धोका निर्माण झाल्याबाबत

**(२०) ४५१५ (१७-०७-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील अत्यंत दाटीवाटीने असलेल्या भांडुप, विक्रोळी पार्कसाईट (घाटकोपर), कुर्ला, मुलुंड, जोगेश्वरी आणि चेंबूर अशा सहा ठिकाणांना भूस्खलन तसेच जमीन आणि डोंगराला भेगा पडण्याची शक्यता असून तेथे असलेल्या वस्त्यांना धोका निर्माण झाला असल्याचा निष्कर्ष जिऑ लॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया (जीआयएस) ने सखोल अभ्यासानंतर काढला असल्याने त्वरीत उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जीआयएसने सुरू केलेल्या सर्वेक्षणांतर्गत सहा विभागातील ४६ वस्त्यांना दरड कोसळण्याचा धोका असल्याचे सांगण्यात आले असून त्यातील २० वस्त्या अतिधोकादायक स्थितीत असल्यामुळे जिवितहानी आणि वित्तहानी होऊ शकते असे अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अहवालात सूचित केल्यानुषंगाने सहा विभागातील ४६ वस्त्यांना दरड कोसळण्याचा असलेल्या धोक्याबाबत गांभीर्याने विचार करून संभाव्य जिवितहानी व वित्तहानी टाळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०१-२०२१) :** (१) सन २०१८ मध्ये भारतीय भौगोलिक सर्वेक्षण विभागाने मुंबईतील दरडी कोसळण्याची शक्यता असलेल्या २९९ संभाव्य ठिकाणाची पाहणी करुन त्याचा अहवाल सन २०१९ मध्ये आपत्कालीन व्यवस्थापन विभागास पाठविलेला आहे. या अहवालातून प्राप्त माहितीनुसार मध्यम ते जास्त धोका असलेली ठिकाणे के/पश्चिम, एल, एम/पूर्व, एन आणि एस विभागात आहेत.

जोगेश्वरी (पूर्व) येथील रामगड (पश्चिम द्रुतगती महामार्ग बाजूला), तसेच जोगेश्वरी गुंफाच्या पाठीमागील बाजूस (जो.वि. लिंक रोडलगत) असलेल्या वस्त्यांना भुस्खलनचा धोका निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे त्याठिकाणी तेथील स्थानिक लोकांना सावधान व जागरुक करणेकरीता जनजागृती करण्यात आली आहे.

तसेच त्वरीत उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने मध्यम ते जास्त धोका असणाऱ्या ठिकाणांचे अहवाल सदर ठिकाणी अखत्यारीत असलेल्या संबंधित विभागांना तसेच जिल्हाधिकारी (उपनगरे), म्हाडा प्राधिकरण इत्यादींना पाठविण्यात आले आहेत.

(२) भारतीय भौगोलिक सर्वेक्षण विभागाने मुंबईतील दरडी कोसळण्याची शक्यता असलेल्या २९९ संभाव्य ठिकाणांची पहाणी करुन ४० ठिकाणे कमी ते मध्यम, २५ ठिकाणे मध्यम, ४० ठिकाणे मध्यम ते अतिधोकादायक, १३२ ठिकाणे कमी व ६२ ठिकाणे धोकादायक नसल्याचे वर्गीकरण केले आहे. तसेच, २९९ पैकी ७४ धोकादायक ठिकाणाचा सविस्तर अभ्यास करुन ७४ ठिकाणी काय उपाययोजना कराव्यात हे भारतीय सर्वेक्षण विभागामार्फत निश्चित करण्यात आले आहे.

मध्यम ते जास्त धोका असणाऱ्या ठिकाणांवर संबंधित यंत्रणांमार्फत उपाययोजना करण्यासाठी सदर माहिती संबंधितांना कळविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बोचरा गांव (ता.अकोट, जि.अकोला) येथे संपूर्ण गावात डेंग्यूची लागण झाल्याबाबत

**(२१) ४६२६ (२३-०७-२०२०) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोचरा गाव (ता.अकोट, जि.अकोला) येथे मोठ्या प्रमाणात डेंग्यूची लागण झाल्याचे माहे जुलै, २०२० च्या प्रथम सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२७-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.

बोचरा गांव (ता.अकोट, जि.अकोला) येथे माहे जुलै, २०२० मध्ये तापाचे रुग्ण तुरळक प्रमाणात आढळून आलेले होते. त्यानुषंगाने तेथील पाच संशयित रुग्णांचे रक्तजल नमुने डेंग्यू तपासणीकरीता दिनांक ८/७/२०२० रोजी सेंटीनल सेंटर्स अकोला येथे पाठविण्यात आले होते तपासणीअंती अदूषित (निगेटिव्ह) आढळून आलेले आहेत.

(२) जिल्हा हिवताप अधिकारी, अकोला यांनी स्वत: संबंधित गावास दिनांक ०७ जुलै, २०२० रोजी भेट देऊन चौकशी केली, यामध्ये बोचरा गांव (ता.अकोट, जि.अकोला) येथे डेंग्यू आजाराचा सन २०२० मध्ये माहे जुलै अखेर एकही रुग्ण आढळून आलेला नाही.

किटकजन्य आजारावर नियंत्रणासाठी अकोल्यासह राज्यात खालील उपाययोजना नियमितपणे राबविण्यात येतात -

१. नियमित साथरोग सर्वेक्षण.
२. किटकजन्य आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियमित किटकशास्त्रीय सर्वेक्षण.
३. रुग्णोपचारासाठी पुरेसा औषधसाठा.
४. निदानासाठी प्रयोगशालेय सुविधा.
५. निदान झालेल्या रुग्णास शासकीय रुग्णालयात मोफत औषधोपचार.
६. किटकजन्य आजारांसाठी एकात्मिक किटक व्यवस्थापन.
७. उद्रेकाग्रस्त भागात किटकनाशक धुरफवारणी अथवा फवारणी.
८. डासोत्पत्ती रोखण्यासाठी कोरड्या दिवसाची अंमलबजावणी होणेबाबत लोकसहभाग.
९. आंतरविभागीय समन्वय
१०. विविध साथरोग प्रतिबंधासाठी जनतेचे आरोग्य शिक्षण.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भिष्णुर (ता.नरखेड, जि.नागपूर) गावात बोगस बियाणे विक्री करणाऱ्या कंपनीवर कारवाई करण्याबाबत

**(२२) ४७०० (१८-०८-२०२०) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिष्णुर (ता.नरखेड, जि.नागपूर) गावात महाबीजचे बियाणे बोगस निघाल्यामुळे शेतकऱ्यांचे पेरणीचे पीक वाया गेले असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एका शेतकऱ्याचे रुपये ७८ हजार ७५० च्या पेरणी पिकाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बोगस बियाणे विक्री करणाऱ्या महाबीज कंपनीवर कारवाई करुन नुसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१९-०१-२०२१) :** (१) होय.

भिष्णुर, ता.नरखेड, जि.नागपूर या गावातील शेतकऱ्यांना महाबीजच्या सोयाबीन बियाणे सदोष असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या.

(२) अंशत: खरे आहे.

(३) महाबीजने नागपूर जिल्ह्यात खरीप-२०२० हंगामात भारतीय बिज प्रमाणीकरणाचे किमान मानकानुसार व बिज प्रमाणीकरण यंत्रणेने प्रमाणित केलेले १०६०८.८० क्विंटल सोयाबीन पिकाचे विविध वाणांचे बियाणे पेरणीकरीता उपलब्ध करुन दिले होते. यामध्ये नरखेड तालुक्यात ६४२.७० क्विंटल मात्रेचा समावेश आहे.

श्री.अनिल धनराजजी रेवतकर व श्री.रुपराव नथ्थुजी कळंबे रा.भिष्णुर, ता.नरखेड यांनी महाबीज सोयाबीन जेएस-९३०५ बियाण्याची उगवण कमी झाल्याबाबत कृषी विभागाकडे तक्रारी केलेल्या आहेत. प्राप्त तक्रारीची त्वरीत दखल घेऊन तालुकास्तरीय बियाणे तक्रार निवारण समिती व महाबीज अधिकाऱ्यांनी तक्रारग्रस्त क्षेत्राची प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली.

तपासणीअंती जिल्हा कार्यालय, महाबीज नागपूर यांचेमार्फत नुकसान भरपाई म्हणून श्री.अनिल रेवतकर यांना ४.५० क्विंटल मात्रेची बियाणे रुपये ३५१००/- व श्री.रुपराव कळंबे यांना ३.९० क्विंटल मात्रेची बियाणे किंमत रुपये २९८२०/- परत केली असता श्री.रुपराव कळंबे यांनी बियाणे किंमत स्वीकारली आहे. परंतु, श्री.रेवतकर यांनी बियाणे किंमत घेण्यास नकार दिलेला आहे. याबाबत त्यांना जिल्हा ग्राहक मंचाकडे दावा दाखल करण्याबाबत मार्गदर्शन केले आहे. तसेच श्री.कळंबे यांनी कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे लेखी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दिवा (जि.ठाणे) येथील बेकायदा बांधकामांचा लेखाजोखा असलेली नस्ती महापालिकेतून चोरी केल्याबाबत

**(२३) ४८५४ (२०-११-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिवा (जि.ठाणे) येथील बेकायदा बांधकामांचा लेखाजोखा असलेली नस्ती महापालिकेच्या तत्कालीन सहायक आयुक्त यांनी चोरल्याचा प्रकार माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन सहायक आयुक्त यांची बदली होताच त्याच रात्री कार्यालयात येऊन बेकायदा बांधकामांच्या नस्ती गायब केल्याप्रकरणी ठाणे महापालिकेने डायघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (२१-०१-२०२१) :** (१) व (२) होय.

श्री.महेश बाबुराव आहेर, कार्यालयीन अधीक्षक, दिवा प्रभाग समिती, ठाणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शिळ डायघर पोलीस स्टेशन, ठाणे येथे गु.र.क्र.४११/२०२० नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्री.सुनिल मोरे, सहाय्यक आयुक्त, ठाणे महानगरपालिका हे दिवा प्रभाग समिती, ठा.म.पा.कार्यालय येथे सहाय्यक आयुक्त पदावर कार्यरत असताना त्यांचे बदली आदेश झाल्यानंतर ठाणे महानगरपालिका कार्यालयाकडून वितरित करण्यात आलेले संगणक संच पैकी एक नवीन सरकारी संगणक संच तसेच कोविड-१९ च्या अनुषंगाने कार्यालयात असलेल्या व इतर महत्वाच्या सरकारी नस्त्या श्री.फिरोज गौस खान यांच्या संगनमताने चोरी करुन स्वतःच्या फायद्यासाठी सरकारी मालमत्तेचा अपहार केलेला आहे.

(३) श्री.सुनिल मोरे यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर त्यांना दिनांक ३०/०९/२०२० रोजी आदेशान्वये ठाणे महापालिकेने निलंबित केले आहे. सदर आदेश कार्यालयात येऊन घेण्याबाबत श्री.सुनिल मोरे यांना कळविण्यात आले असता, त्यांनी आजतागायत कार्यालयाशी संपर्क साधलेला नाही. त्यामुळे निलंबन आदेश नोंदणीकृत पोच देय डाकेने त्यांच्या पत्त्यावर पाठविले असता सदर आदेश परत आले आहेत. त्यामुळे निलंबनाचे आदेश बजाविता आले नाहीत.

शिळ डायघर पोलीस ठाण्यात गु.र.क्र.४११/२०२० नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. यातील आरोपींनी मा.जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे या ठिकाणी केलेला अटकपूर्व जामीनाचा अर्ज मा.न्यायालयाने नामंजूर केला असून सदरचे दोन्ही आरोपींनी अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे अर्ज सादर केला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी श्री.सुनिल मोरे, सहायक आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यास मा.उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज क्रमांक ३७२५/२०२० मध्ये दिनांक १०/१२/२०२० रोजी अटकपूर्व मंजूर केला असून, त्यास रुपये २५०००/- इतक्या रकमेच्या लायक जामीनावर मुक्त करण्याचे आदेश दिलेले आहेत. तसेच त्यास दिनांक २१/१२/२०२०, २८/१२/२०२०, ४/०१/२०२१, ११/०१/२०२१ रोजी तपासाकामी पोलीस ठाण्यात हजर राहण्याचे आदेश दिलेले आहेत. सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्यात आणणाऱ्या योजनेला चालना देण्याबाबत

**(२४) ४८७४ (२३-११-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातून समुद्रात वाहून जाणारे १६७ दशलक्ष घनमीटर (टीएमसी) पाणी मराठवाड्यात आणणाऱ्या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता प्रदान करुन चालना देण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ ऑक्टोबर, २०२० रोजी पत्रान्वये शासनाला केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडा व खान्देशाचा सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी तत्कालीन शासनाने समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्यात आणणाऱ्या महत्वाकांक्षी प्रकल्पाची पूर्वतयारी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाला शासन चालना देणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२१-०१-२०२१) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

पश्चिमवाहिनी नदीखोऱ्यातील (कोकण) उल्हास, वैतरणा, नार-पार व दमणगंगा खोऱ्यात एकूण ३६० अघफू अतिरिक्त पाणी उपलब्ध आहे. सदर अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणे शक्य आहे. पश्चिमवाहिनी नदी खोऱ्यातील (कोकण) अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणेसाठी प्राथमिक अभ्यास करणेकरीता कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करणेत आली आहे. त्यानुसार गोदावरी खोऱ्यात कोकणातील नार-पार, दमणगंगा, वैतरणा, उल्हासनदी खोऱ्यातून एकूण ८९.८५ अघफू पाणी वळविणेबाबत आखणी करून त्याबाबत शिफारस केली आहे. उपरोक्त पैकी २.४३ अघफू पाणी वळणाच्या पूर्ण/बांधकामाधीन योजना आहेत. १५.५५ अघफू

पाणी वळणाबाबत पार-गोदावरी नदीजोड प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला असून दमणगंगा-वैतरणा-गोदावरी व दमणगंगा-एकदरे-गोदावरी या दोन नदीजोड प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय जलविकास प्राधिकरण, नवी दिल्ली यांचेमार्फत तयार करण्यात येत आहे. दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर उर्ध्व वैतरणा धरणातून गोदावरी खोऱ्यात १० अघफू पाणी सोडण्यात येईल. उर्वरीत ६१.८८ पाणी वळणाबाबतच्या योजनांचे सर्वेक्षण करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेबाबत कार्यवाही प्रगतीत आहे. नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पाचे सविस्तर प्रकल्प अहवाल राज्यस्तरीय सल्लागार समितीमार्फत तपासणीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भिवंडी (जि.ठाणे) शहरातील इंदिरा गांधी उपजिल्हा रूग्णालयात सोयी सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(२५) ४९४३ (१७-११-२०२०) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) शहरातील इंदिरा गांधी उपजिल्हा रूग्णालयास कोविड-१९ घोषित करण्यात आले असले तरी या रूग्णालयातील एक्सरे, सिटी स्कॅन, एमआरआय, डायलेसिस व सोनोग्राफी आदी मशीन मागील काही महिन्यांपासून बंद असल्याने रूग्णांना खाजगी ठिकाणी आर्थिक भूर्दंड सहन करून चाचण्या कराव्या लागत असून अनेक सोयी सुविधांचा अभाव असल्याने उपचारापासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रूग्णालयाच्या या कारभारामुळे गोरगरीब व गर्भवती महिलांचे मोठ्या प्रमाणात हाल होत असल्याने उपचारासाठी रूग्णालयात गेलेल्या महिलांना जिल्हा सामान्य रूग्णालय, ठाणे, छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालय, कळवा व मुंबई येथील रूग्णालयात पाठविण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रूग्णालयातील गैरसोयीसंदर्भात विविध मागण्यांचे एक सविस्तर निवेदन रूग्णालय अधीक्षकांना माहे ऑक्टोबर, २०२० च्या पहिल्या आठवड्यात सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू रूग्णालयातील सर्व अत्यावश्यक मशीन विनाविलंब संपूर्ण क्षमतेने कार्यान्वित करून तसेच रूग्णांना सोयी सुविधा व औषधोपचार मिळण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२२-०१-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

उपजिल्हा रुग्णालय, भिवंडी येथे कोविड-१९ चा प्रादुर्भाव होण्यापूर्वी क्ष-किरण, सी.टी.स्कॅन, सोनोग्राफी व डायलेसिस सेवा कार्यान्वित होत्या. तथापि, एप्रिल, २०२० मध्ये सदरहू रुग्णालय डेडिकेट कोविड रुग्णालय म्हणून घोषित केल्याने वरील सेवा तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आल्या होत्या. तद्नंतर क्ष-किरण व सी.टी.स्कॅन सेवा पुन्हा सुरु करण्यात आलेल्या आहेत. सोनोग्राफी सेवा लवकरच सुरु करण्यात येत आहे. डायलेसिस सेवा कोविड रुग्णालय विभागात असल्यामुळे सुरु करण्यात आलेली नाही. सदरील रुग्णालयात एमआरआय सेवा उपलब्ध नाही.
(२) हे खरे नाही.

उपजिल्हा रुग्णालय, भिवंडी हे डेडिकेट कोविड रुग्णालय म्हणून घोषित केल्याने, गर्भवती महिलांची गैरसोय होऊ नये याकरीता खाजगी रुग्णालय ऑरेंज हॉस्पिटल, भिवंडी येथे प्रसूती विभाग सुरु करण्यात आला होता.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) क्ष-किरण व सी.टी.स्कॅन मशीन कार्यान्वित असून, सोनोग्राफी सेवा, डायलेसिस विभाग व इतर नॉनकोविड विभाग कोविड-१९ साथीच्या परिस्थितीनुसार सुरु करण्यात येत आहेत.

---

## वसई (ता.वसई, जि.पालघर) येथील ऐतिहासिक वास्तुंचे जतन व संवर्धन करण्यासाठी स्वतंत्र वस्तुसंग्रहालय स्थापन करण्याबाबत

**(२६) ४९८३ (१७-११-२०२०) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (ता.वसई, जि.पालघर) येथील ऐतिहासिक वास्तुंचे जतन व संवर्धन करण्यासाठी एक स्वतंत्र वस्तुसंग्रहालय स्थापन करण्याची मागणी वसई येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.नगर विकास मंत्री, मा.पालकमंत्री, पालघर जिल्हा यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांनी पत्र क्रमांक : सामान्य प्रशासन/कक्ष-१/कावि/३०८, दिनांक ४ एप्रिल, २०१९ अन्वये व तहसिलदार, पालघर यांनी पत्र क्रमांक : प्रशासन/एसआर १० ते १८/१९, दिनांक ७ ऑगस्ट, २०१९ अन्वये कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांना आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२१-०१-२०२१) :** (१) व (२) होय.
(३) संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये यांनी वसई-विरार करीता शहर वस्तुसंग्रहालय (City Museum) स्थापन करणेबाबत दिनांक १/८/२०१७ व दिनांक १९/६/२०१८ रोजीच्या पत्रान्वये संबंधित महानगरपालिकेचे महापौर, आयुक्त व जिल्हाधिकारी यांना प्रस्तावित केले होते व अभिप्राय कळविण्याबाबत कळविले होते. परंतु, याबाबत पुढे वसई-विरार महानगरपालिका व जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांच्याकडून पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयास उत्तर प्राप्त झाले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

___

## राज्यात तालुकास्तरावर डायलेसिस उपचार पध्दती सुरु करण्याबाबत

**(२७) ४९९७ (२३-११-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मूत्रपिंड आजाराने त्रस्त रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्याने या रुग्णांच्या उपचारासाठी तालुकास्तरावर डायलेसिस उपचार पध्दती सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व प्रस्तावाबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) सदरहू प्रस्तावावर अद्यापपर्यंत निर्णय घेण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२२-०१-२०२१) :** (१) तालुकास्तरावर आवश्यकतेनुसार डायलेसिस सेंटर सुरु करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सद्य:स्थितीत तालुकास्तरावरील २८ रुग्णालयात डायलेसिस सेंटर सुरु करण्यात आलेली आहेत.

(२) व (३) प्रथम टप्प्यात जिल्हास्तर तद्नंतर १०० खाटांची उपजिल्हा रुग्णालये आणि खारपाणपट्ट्यातील काही ग्रामीण रुग्णालये येथे डायलेसिस सुविधा सुरु करण्यात आली आहे. ५० डायलेसिस मशीन खरेदी करण्याची प्रक्रिया हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळांतर्गत खरेदी (कक्ष) यांच्या स्तरावरुन सुरु आहे.

---

## सावली (जि.चंद्रपूर) येथील सिंचन उपविभागीय कार्यालय बंद करून इतरत्र हलविण्यात येणार असल्याबाबत

**(२८) ५२५४ (१४-१२-२०२०) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावली (जि.चंद्रपूर) येथील सिंचन उपविभागीय कार्यालय बंद करून ते गोंडपिंपरी येथे हलविण्यात येणार असल्याचे दिनांक ३ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सिंचन उपविभागीय कार्यालय इतरत्र हलविण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२७-०१-२०२१) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात विशेषतः पूर्व विदर्भातील जिल्हयामध्ये मलेरिया आजारावर नियंत्रण मिळविण्याबाबत

**(२९) ५२६३ (२३-११-२०२०) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषतः पूर्व विदर्भातील वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयात मलेरियाचे १ हजार ७९४ रूग्ण माहे जानेवारी, २०२० ते जून, २०२० या कालावधीमध्ये आढळून आल्याचे दिनांक ९ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जिल्हयांमध्ये मलेरिया आजारावर नियंत्रण मिळविण्याबाबत शासनाने कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२२-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.

पुर्व विदर्भातील जिल्ह्यांमध्ये माहे जानेवारी, २०२० ते माहे जून, २०२० या कालावधीतील आढळून आलेल्या हिवताप आजार रुग्णांची संख्या खालीलप्रमाणे -

| जिल्हा | लागण |
|---|---|
| नागपूर | २ |
| नागपूर मनपा | २ |
| वर्धा | ० |
| भंडारा | २ |
| गोंदिया | ३३ |
| चंद्रपूर | ५१ |
| चंद्रपूर मनपा | ० |
| गडचिरोली | १७०४ |
| एकूण | १७९४ |

(२) पुर्व विदर्भासह राज्यात किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत हिवताप आजाराच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी खालील उपाययोजना नियमितपणे राबविल्या जातात.

१. नियमित साथरोग सर्वेक्षण व निदान झालेल्या रुग्णांवर त्वरीत समुळ औषधोपचार.
२. आवश्यकतेनुसार सर्वेक्षण, फवारणी, रक्ततपासणीसाठी अधिकचे मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे तसेच पुरेसा औषधसाठा उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
३. दुर्गम भागामध्ये त्वरीत निदानासाठी रॅपीड डायग्नॉस्टिक टेस्ट किट्सचा पुरवठा.
४. वैयक्तिक संरक्षणासाठी सन २०२० पर्यंत पुर्व विदर्भात ६,४०,६९५ किटकनाशक भारित मच्छरदाण्यांचे वाटप प्रगतीपथावर

५. विविध साथरोग प्रतिबंधासाठी जनतेचे आरोग्य शिक्षण. आंतरविभागीय समन्वय.

६. हिवतापाच्या निदान व औषधोपचारासाठी जिल्हयातील सर्व प्रा.आ.केंद्र. व सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये मोफत व्यवस्था आहे.

७. दरवर्षी २५ एप्रिल जागतिक हिवताप दिन व जून महिना हिवताप विरोधी महिना म्हणून साजरा केला जातो.

८. उद्रेकग्रस्त गावांमध्ये ग्रामसभेच्या माध्यमातुन जनजागृती.

९. स्थानिक केबल, वृत्तपत्राव्दारे, लोकप्रतिनिधीच्या समन्वयाव्दारे जनतेला आवाहन करण्यात येते. तसेच हस्तपत्रिका वाटप, कोरडा दिवस पाळणे, मायकिंगव्दारे जनजागृती केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्हयातील मुलींना शिक्षणाच्या नावाखाली वसतिगृहा ऐवजी बालगृहात डांबून ठेवल्याबाबत

**(३०) ५३२७ (१८-११-२०२०) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील २५ मुलींना शिक्षणाच्या नावाखाली वसतिगृहा ऐवजी बालगृहात बेकायदेशीररीत्या डांबून ठेवल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलींच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आल्याने जिल्हा परिषद सदस्य यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक, पालघर यांस माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (०२-०२-२०२१)** : (१) नाही.
(२) होय.

श्रीमती वैदेही वाढाण, सदस्य, स्थायी व अर्थ समिती, जिल्हा परिषद, पालघर यांनी दिनांक २९/०६/२०२० रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर यांना याबाबतचा तक्रार अर्ज दिलेला आहे.
(३) सदर प्रकरणी चौकशी केली असता वालीव पोलीस स्टेशनच्या हद्दीतील आशा सदन येथील मुलींच्या अनाथ आश्रमातील मुलींना देशात पसरलेल्या कोविड-१९ या संक्रामक रोगाच्या अनुषंगाने बाल कल्याण समिती पालघर यांचे आदेशान्वये महिला व बाल संरक्षण अधिकारी यांचे समक्ष त्यांच्या पालकांच्या स्वाधिन केले असून सदर प्रकरणी कोणतेही प्रकारे आक्षेपार्ह आढळून न आल्याने संबंधित पोलीस स्टेशनकडून सदर अर्ज दिनांक २७/०७/२०२० रोजी निकाली काढून दप्तरी दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यातील पूर्णा नदीवर बांधण्यात आलेल्या घुंगशी बॅरेजमधील पाणी दूषित झाल्याबाबत

**(३१) ५३४८ (२३-११-२०२०) डॉ.रणजित पाटील** : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यातील पूर्णा नदीवर बांधण्यात आलेल्या घुंगशी बॅरेजमधील पाणी हिरवेगार व दूषित झाल्याचे माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घुंगशी बॅरेजमधील दूषित पाणी पिण्यास व सिंचन योग्य नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी सदर बाब पाटबंधारे विभागाच्या निदर्शनास आणून तपासणी करून उपाययोजना करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२८-०१-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) पाण्याचे नमुने तपासण्यासाठीची कार्यवाही उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अकोला यांचे तर्फे सुरु आहे. कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प जलसंपत्ती व अन्वेषण विभाग, अमरावती यांचे दिनांक २६/११/२०२० चे पत्रान्वये पाण्याचे गुणवत्ता विषयक चाचणी अहवालाचे निष्कर्षाबाबत वस्तुनिष्ठ अहवाल अभिप्रायासह सादर करण्याबाबत प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अमरावती यांना कळविले आहे. तसेच भविष्यात धरणातील पाणी दुषित होणार नाही या करीता आवश्यक उपाययोजना करणेकरीता महानगरपालिका, अमरावती यांना देखील मंडळ कार्यालयाने दिनांक १३/३/२०२० चे पत्रान्वये कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्याबाबत

**(३२) ५३७३ (१७-११-२०२०) श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना विषाणूची मोठ्या प्रमाणात लागण झाली असून त्यात हजारो रुग्णांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत कोरोनाचे किती रुग्ण आढळले आहेत व किती रुग्णांचा मृत्यू झाला आहे,

(३) असल्यास, राज्यात पसरलेल्या कोरोना विषाणूच्या साथीवर नियंत्रण मिळविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२७-०१-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दिनांक २० नोव्हेंबर, २०२० च्या अहवालानुसार राज्यात कोरोना विषाणूमुळे होणाऱ्या आजाराचे १७,६८,६९५ एवढे रुग्ण आढळले असून त्यापैकी १६,४२,९१६ इतके रुग्ण या आजारातून बरे झाले आहेत तर राज्यामध्ये आतापर्यंत ४६,५५१ रुग्णांचा मृत्यू या आजारामुळे झाला आहे.

(३) कोरोना विषाणूवर नियंत्रण मिळविण्यासाठी शासनाने खालील उपाययोजना केल्या आहेत.

- कोरोना निदानासाठी आवश्यक RTPCR प्रयोगशाळा स्थापना ॲन्टीजेन चाचण्यांची उपलब्धता/कोविडबाधित संशयीत यांचे निकटसंपर्क यांची चाचणी अलगीकरण विलगीकरण केंद्र, त्रिस्तरीय रुग्णालय स्थापन.
- संपर्कसाखळी तोडण्यासाठी लॉकडाऊन, कंटेन्मेंट झोन स्थापना व अंमलबजावणी.
- कोविडबाधा निदानासाठी चाचण्यांसाठी प्रयोगशाळांची स्थापना, तातडीच्या तपाणीसाठी मुबलक ॲन्टीजेन टेस्टची उपलब्धता.
- बाधितापासून संक्रमण रोखण्यासाठी निकटसंपर्कातील व्यक्तींचा शोध, तपासणी, आवश्यकतेनुसार अलगीकरण विलगीकरण व्यवस्था त्रिस्तरीय रुग्णालय व्यवस्थापन, फिवर क्लिनीक, सारी फ्ल्युसदृश्य रुग्णांचे सर्वेक्षण, जनजागृती राज्यातील प्रत्येक कुटुंबातील व्यक्तींची प्राथमिक तपासणी, रुग्णोपचारासाठी पुरेसा औषधसाठा.
- आरोग्य सेवा देणाऱ्यासाठी पुरेसा वैयक्तिक संरक्षण साधने, मास्कची उपलब्धता करुन देणे.
- खाजगी रुग्णालयातील कोविड नॉनकोविड उपचारासाठी आकारावयाच्या देयकाबाबत दर निश्चिती, HRCT, RTPCR, ॲन्टीजेन ॲन्टीबॉडी चाचण्यांचे दरनियंत्रण, मास्क दर नियंत्रण मेडीकल रुग्णांना मेडीकल ऑक्सीजन पुरवठा सुरळीत करण्यासाठी नियंत्रण, उपचारासाठी आवश्यक रेमडीसिव्हीर इंजेक्शनचा पुरेसा साठा व सनियंत्रण
- राज्यातील सर्व जनतेसाठी महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना लागू करणे.
- कोरोना प्रतिबंधासाठी अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी ५० लाख रुपयांचे विमा कवच.

- कोविड उपचारासाठी व उपचार पश्चात उद्‌भवलेल्या शारीरिक गुंतागुंतीवर मार्गदर्शनासाठी खाजगी विशेषज्ञ/तज्ञ डॉक्टरांचे टास्क फोर्सचे गठन.
- जागतिक आरोग्य संघटना, आरोग्य मंत्रालय, नवी दिल्ली व आय.सी.एम.आर.च्या मार्गदर्शक सूचनांचे पालन इत्यादी.
- सर्व प्रसारमाध्यमाव्दारे मोठ्या प्रमाणात जनजागृती करुन कोविड साथरोग आटोक्यात आणण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्नशील आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बीड जिल्हयातील जायकवाडी पाटबंधारे विभागाच्या कंत्राट देण्याच्या कामात गैरप्रकार झाल्याबाबत

**(३३) ५५०० (१७-११-२०२०) श्री.विनायकराव मेटे : दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ६ मधील प्रश्न क्रमांक ४४२४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड या कार्यालयाने कळविल्यानुसार कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड यांनी पाटबंधारे उपविभाग, बीडच्या इमारत दुरुस्तीसाठी ३ निविदा काढल्या असून त्याची एकत्रित किंमत ८.९७ लक्ष इतकी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हरित क्रांती पाणी वापर सहकारी संस्था बिंदुसरा तलाव, बीड व इतर यांनी दिनांक १८ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अधीक्षक अभियंता, उर्ध्व पैनगंगा प्रकल्प मंडळ, नांदेड यांच्यामार्फत प्राथमिक चौकशी करण्यात येत असून चौकशी अहवालानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२७-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी प्राथमिक चौकशी करण्यासाठी प्रादेशिक कार्यालयाने सुधारीत आदेश दिनांक २०/११/२०२० अन्वये, श्री.अ.शि. म्हेत्रे, अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लातूर यांना नियुक्त केले असून सदर चौकशी प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील दिव्यांगाना अपंगत्वाचे प्रमाणपत्रे तालुकास्तरावर वितरित व नुतनीकरण करुन मिळणेबाबत

**(३४) ५५६९ (२३-११-२०२०) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०१२ मधील शासन निर्णयानुसार जिल्हा रूग्णालय, उपजिल्हा रूग्णालय, ग्रामीण रूग्णालय व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय या ठिकाणी आठवड्यातून एकदा अपंगत्वाची प्रमाणपत्रे तालुकास्तरावर वितरित करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील कोरोना संक्रमण काळात दिव्यांगाना गत सात ते आठ महिन्यांपासून दिव्यांग कक्ष व ऑनलाईन यंत्रणा बंद असल्याने दिव्यांग प्रमाणपत्र नुतनीकरणाकरीता अडचणी येत असून प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेल्या दिव्यांगाचे अर्ज तपासणीविना प्रलंबित असल्याने शासकीय योजनेचा लाभ मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा रूग्णालय, उपजिल्हा रूग्णालय, ग्रामीण रूग्णालय व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय या ठिकाणी अजूनही अपंगत्वाची प्रमाणपत्रे वितरित केली जात नसल्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, लॉकडाऊनमध्ये शासकीय योजनापासून मिळणारे उत्पन्नाचे सर्व मार्ग बंद झाल्याने दिव्यांगामध्ये निराशाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने तालुकास्तरावर दिव्यांगाना अपंगत्वाची प्रमाणपत्रे व शासकीय योजनेचा लाभ मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०२-०२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

कोविड-१९ च्या प्रादुर्भामुळे दिव्यांगाना संसर्ग होऊ नये याकरीता रुग्णालयातील दिव्यांग कक्ष तात्पुरत्या स्वरूपात बंद ठेवण्यात आले होते.

(३) राज्यातील जिल्हा/ उपजिल्हा/ शासकीय महाविद्यालये या ठिकाणी कोविड-१९ साठी संपूर्ण रुग्णालये वापरात असल्याने दिव्यांग प्रमाणपत्र वितरित केले जात नव्हते. टाळेबंदीमध्ये शिथिलता आणल्यानंतर दिनांक १२/१०/२०२० पत्रान्वये दिव्यांग प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील रूग्णालयामध्ये रक्ताचा तुटवडा असल्याबाबत

**(३५) ५५८० (१७-११-२०२०) डॉ.परिणय फुके, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे शाळा, महाविद्यालयांना सुट्टी दिल्यामुळे तसेच मेळावे व सार्वजनिक कार्यक्रमांवर बंदी असल्याचा परिणाम रक्तदानावर झाला आहे त्यामुळे नागपूर येथील मेडिकल, सुपर स्पेशालिटी रुग्णालय, मेयो रुग्णालय व डागा स्मृती शासकीय स्त्री रूग्णालयामध्ये रक्ताचा तुटवडा निर्माण झाल्याने गंभीर रुग्णांवरील उपचारात अडचणी येत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुग्णालयातील प्रसुती वॉर्डासह इतरही वॉर्डात रक्ताच्या तुटवड्याचे कारणसमोर करून दलालांशी संगनमत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रक्ताच्या तुटवड्याचे कारणसमोर करून दलालांशी संगनमत असलेल्यांवर कारवाई करुन रक्ताचा तुटवडा दूर करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२२-०१-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरातील अंबाझरी तलावाचा सुरक्षा बांध जीर्णावस्थेत असल्याबाबत

**(३६) ५५८१ (२०-११-२०२०) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील अंबाझरी तलावाचा सुरक्षा बांध जीर्णावस्थेत असून सदर बांध बळकटी करण्याबाबत महानगरपालिका व मेट्रोचा प्रस्ताव गत ४ वर्षापासून प्रलंबित असल्याची बाब निदर्शनात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तलावाचे बळकटीकरण व सुशोभिकरण करण्याकडे शासकीय यंत्रणा जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत असल्यामुळे सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन तलावाची देखभाल व दुरुस्ती आणि सुरक्षा बांधाची बळकटी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२७-०१-२०२१) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) सुरक्षा बांधाच्या बळकटीचे अंदाजपत्रक विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ मार्फत तयार करण्यात आले आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकाची किंमत रुपये २१.०६ कोटी एवढी आहे. उक्त अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी आयुक्त, म.न.पा. नागपूर यांना दिनांक २४/११/२०२० रोजी पाठविण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भांदरे नदीवर (ता.माणगाव, जि.रायगड) नवीन पूल बांधण्याबाबत

**(३७) ५६४७ (२०-११-२०२०) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भांदरे नदीवरील (ता.माणगाव, जि.रायगड) पूल दिनांक ६ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास झालेल्या अतिवृष्टीत कोसळल्यामुळे मळेगाव आदिवासीवाडी, हातकेळी, मुगवली, कविळवहाळ व भांदरे इत्यादी गावांचा संपर्क तुटल्यामुळे ग्रामस्थांना प्रवास करणे गैरसोयीचे होत असून शेतकऱ्यांना शेतीवर जाण्याचा मार्गही बंद झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेला दोन महिन्यांचा कालावधी उलटूनही उक्त पुलाच्या दुरूस्तीकडे अथवा नवीन पूल बांधण्याकडे संबंधित विभागाकडून कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने भांदरे नदीवर नवीन पूल बांधण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२८-०१-२०२१) :** (१) रायगड जिल्ह्यातील काळ प्रकल्पांतर्गतच्या माणगाव शाखा कालव्यावरील भांदरे गावाजवळील सा.क्र.२०/३९५ मी. येथील ४० वर्षापूर्वीचा दगडी बांधकामातील सेवापथाचा पूल दिनांक ०६/०८/२०२० रोजी अतिवृष्टी झाल्याने नदी पाणी पातळीत वाढ

झाल्याने ढासळला आहे. त्यामुळे काही स्थानिक शेतकऱ्यांचा शेतावर जाण्याचा मार्ग बंद झाला. तथापि, यामुळे स्थानिक शेतकरी वगळता मळेगाव आदिवासीवाडी, हातकेळी, मुगवली, कविळवहाळ व भांदरे इत्यादी गावातील ग्रामस्थांची गैरसोय झालेली नाही, कारण या गावांना संपर्कासाठी इतर पर्यायी मार्ग उपलब्ध आहेत.

(२) नाही, अशी बाब नाही.

सदर पूलाच्या दुरूस्तीकरीता आवश्यक कामाचा समावेश सन २०२०-२०२१ च्या मंजूर प्रापणसूचीत केलेला असून त्याव्दारे सदर दुरूस्तीचे काम करण्याचे नियोजन कोकण पाटबंधारे विकास महामंडळाने केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजनेंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांना घरकुले मंजूर करण्याबाबत

**(३८) ५८२४ (१४-१२-२०२०) श्री.राजेश राठोड, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजनेंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात घरकुले मंजूर झाली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या नागरीकांवर अन्याय झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या नागरीकांसाठी उक्त योजनेंतर्गत घरकुले मंजूर करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२१-०१-२०२१) :** (१) शासन निर्णय, दिनांक २४/०१/२०१८ मधील तरतुदींनुसार यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजना राबविण्यात येत आहे. विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात घरकुल मंजूर करण्यात येत नाहीत.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठवाड्याला सिंचनासाठी विशेष अनुदान देण्याबाबत

**(३९) ५८६१ (१४-१२-२०२०) श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यामध्ये वर्षानुवर्षे सिंचनाचा अभाव असल्यामुळे सिंचन क्षमता कमी झाल्याने शेतकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठवाड्यातील सिंचन क्षमता वाढविण्यासाठी विशेष अनुदान देण्याबाबतचा शासन निर्णय घेणार आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२८-०१-२०२१) :** (१) मराठवाड्यात एकूण प्रकल्पीय सिंचन क्षमता १४.३० लक्ष हेक्टर असून त्यापैकी जून, २०२० अखेर ११.६८ लक्ष हेक्टर (८२%) सिंचन क्षमता निर्मित झाली आहे.

मराठवाडा प्रदेशातील प्रकल्पांच्या क्षेत्रात नेहमी सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान होत आहे. ज्यामुळे प्रकल्पात पुरेसा पाणीसाठा होत नाही. पाणीसाठा कमी होत असल्याने पूर्ण क्षमतेने सिंचन होत नाही. प्रकल्पात पाण्याच्या उपलब्धतेनुसार प्रत्येक वर्षी सिंचन करण्यात येत आहे.
(२) मराठवाड्यातील बांधकामाधीन प्रकल्पांसाठी शासन अंशदान, केंद्र शासन अर्थ सहाय्यित बळीराजा जल संजीवनी योजना (BJSY), प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना (PMKSY) या योजनांमार्फत निधी उपलब्ध करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मेळघाटातील सेमाडोह व हरिसाल येथील टेलिमेडिसीन योजना पूर्ववत करण्याबाबत

**(४०) ५८८१ (२३-११-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, अॅड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मेळघाटातील (जि.अमरावती) सेमाडोह व हरिसाल येथील जनतेसाठी सुरु केलेल्या टेलिमेडिसीन सेवेत बिघाड झाल्याने ही सेवा काही महिन्यातच बंद झाल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टेलिमेडिसीन सेवा बंद असल्याने गंभीर किंवा तातडीची आरोग्य सुविधा रुग्णांना मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने मेळघाटातील सेमाडोह व हरिसाल येथील टेलिमेडिसीन योजना पूर्ववत करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१९-०१-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र, सेमाडोह येथील टेलिमेडिसीन सेवा शिव आरोग्य योजनेंतर्गत (खाजगी स्वरुपात) प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात आली होती. परंतु, निधी व मनुष्यबळ उपलब्ध नसल्यामुळे सन २०१७ पासून टेलिमेडिसीन सेवा बंद पडली आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र, हरिसाल येथे महाराष्ट्र शासन व मायक्रोसॉफ्ट इंडिया प्रा.लि. यांचे संयुक्त विद्‌यमाने टेलिमेडिसीन योजना सुरु करण्यात आली होती. परंतु, निधी व मनुष्यबळ उपलब्ध नसल्यामुळे सप्टेंबर, २०१९ पासून टेलिमेडिसीन सेवा बंद आहे.

(२) हे खरे नाही.

उक्त प्रकरणी प्राथमिक आरोग्य केंद्र, हरिसाल व सेमाडोह येथे टेलिमेडिसीन सेवा बंद असली तरी प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांना प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली जाते. तसेच उपजिल्हा रुग्णालय, धारणी व ग्रामीण रुग्णालय, चिखलदरा व जिल्हा स्त्री रुग्णालय येथे रूग्णांना शासकीय वाहनाने पुढील उपचारासाठी संदर्भित करुन आरोग्य सेवा दिली जाते. उपजिल्हा रुग्णालय, धारणी व ग्रामीण रुग्णालय, चिखलदरा येथे टेलिमेडिसीन सेवा सुरू आहे.

(३) चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि, आरोग्यवर्धिनी कार्यक्रमांतर्गत E-sanjivani software चा वापर करुन Teleconsultation ची सुविधा निर्माण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोरोनाची लागण झालेल्या खाजगी डॉक्टरांना विमा सुविधा देण्याबाबत

**(४१) ५९६२ (२३-११-२०२०) श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनाची लागण झालेल्या रुग्णांना रुग्णसेवा देणाऱ्या खाजगी डॉक्टरांना कोणत्याही प्रकारची विमा सुविधा दिली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या पंतप्रधान गरीब कल्याण योजनेमध्ये सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश करण्याबाबतचे आदेश असतानाही खाजगी डॉक्टरांना विमा सुविधापासून वंचित ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने खाजगी डॉक्टरांना विमा सुविधा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२७-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.

राज्यातील खाजगी रुग्णालयात कार्यरत वैदयकीय व्यावसायिक व त्यांच्या आस्थापनेवर कार्यरत नर्सेस व इतर संवर्गातील आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सेवा शासनाकडून कोविड रुग्ण सेवेसाठी अधिग्रहित केल्या असल्यास, तसेच खाजगी रुग्णालय कोविड उपचारासाठी नोंदणीकृत केले असल्यास, त्याठिकाणी कार्यरत डॉक्टर्स तसेच नर्सेस व इतर वैदयकीय सेवा पुरविणाऱ्या सर्व संवर्गाना प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज अंतर्गत विमा संरक्षण रुपये ५० लक्ष देय आहे.

त्यानुसार दिनांक ३०/११/२०२० पर्यंत राज्यभरातून एकूण ३७ शासकीय व खाजगी डॉक्टरांचे कोविडमुळे मृत्यू झाल्या कारणाने प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज अंतर्गत विमा दावे प्राप्त झाले आहेत. यामध्ये १२ शासकीय डॉक्टर्स व २५ खाजगी वैदयकीय अधिकारी व २ खाजगी वैदयकीय व्यावसायिकांचे विमा प्रस्ताव या योजनेंतर्गत रक्कम रुपये ५० लक्ष संबंधितांच्या वारसदारास अदा करण्यात आले आहेत. याशिवाय एकूण प्रस्तावापैकी ९ शासकीय वैदयकीय अधिकारी व २ खाजगी वैदयकीय व्यावसायिकांचे विमा प्रस्ताव संचालक आरोग्य सेवा, पुणे यांचे शिफारशीसह केंद्र शासनास सादर करण्यात आले आहेत.

तसेच, राज्यभरातून प्राप्त झालेल्या खाजगी वैदयकीय व्यावसायिकांचे २१ विमा प्रस्ताव केंद्र शासनाच्या योजनेमध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार कोविड रुग्णसेवेशी संबंधित नसून, त्यांचे सेवा शासनामार्फत अधिग्रहित केल्या नसल्यामुळे त्यांचे दावे प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज अंतर्गत अमान्य करण्यात आले आहेत.

(२) प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज अंतर्गत कोविड रुग्णालयामध्ये अथवा कोविड रुग्णांना प्रत्यक्ष सेवा देणाऱ्या शासकीय सेवेत कार्यरत व सेवा अधिग्रहित केलेल्या खाजगी मान्यता प्राप्त रुग्णालयातील डॉक्टर्स, नर्सेस इत्यादी कर्मचारी व कोविड बाधित कार्यक्षेत्रामुळे मृत्यू झाल्यास त्यांना ५० लाख विमा संरक्षण कवच देण्यात आले आहे. तसेच आरोग्य कर्मचाऱ्याव्यतिरिक्त कोरोनाच्या सार्वत्रिक साथीमध्ये सर्वेक्षण, शोध, माग काढणे, प्रतिबंध, चाचणी, उपचार व मदत कार्य यांचेशी संबंधित कर्तव्य बजावित असताना कर्मचाऱ्याचा दुर्देवाने मृत्यू झाल्यास आपत्कालीन सेवेतील

कर्मचाऱ्यांसाठी वित्त विभागाने दिनांक २९/०५/२०२० रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार या कर्मचाऱ्यांना ५० लाखाचे विमा संरक्षण/सानुग्रह अनुज्ञेय करण्यात आले आहे.

राज्यभरातील केंद्र शासनाकडून एकूण ३३ मान्य प्रस्तावापैकी ८ विमा प्रस्ताव शासनाकडून अधिग्रहित तथा नोंदणीकृत केलेल्या खाजगी रुग्णालयात कार्यरत विविध संवर्गातील कर्मचाऱ्यांचे आहेत. यामध्ये २ खाजगी वैद्यकीय व्यावसायिकासह १ अधिपरिचारिका, १ प्रयोगशाळा तंत्रज्ञ, १ एक्सरे तंत्रज्ञ, २ प्रयोगशाळा सहायक व १ परिचराचा समावेश आहे. संबंधितांच्या वारसदारास योजनेंतर्गत मंजूर सानुग्रह अनुदान रुपये ५० लक्ष वर्ग करण्यात आले आहेत. तथापि, खाजगी वैदयकीय व्यावसायिकांच्या सेवा शासनामार्फत कोविड रुग्णसेवेकरीता अधिग्रहित केले नसल्यास अथवा संबंधितांचे खाजगी रुग्णालय कोविड रुग्ण सेवेसाठी नोंदणीकृत नसल्यास त्यांच्या सेवा प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज अंतर्गत पात्र ठरत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शेतीच्या पाणी वाटपाचे खाजगीकरण केल्याबाबत

**(४२) ६०१५ (१४-१२-२०२०) श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतीसाठी पाणीपुरवठा करण्यापासून ते पाणीपट्टी बसविण्यापर्यंतच्या कामाचे खाजगीकरण करण्याचा तसेच धरणांच्या लाभक्षेत्रातील खाजगी विहिरींमधून जे पाणी वापरले जाते, त्यावरही पाणीपट्टी लावण्याचा जलसंपदा विभागाचा प्रस्ताव असून तो शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय व त्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने जनतेवर अतिरिक्त आर्थिक भार पडू नये याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२७-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४३) ६०२२ (२३-११-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयातील पदे गेल्या अनेक वर्षापासून रिक्त असल्याने कोरोना काळात मनोरुग्णालयातील कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मनोरुग्णालयातील एकूण ७२५ मंजूर पदांपैकी २५५ पदे रिक्त असून चिकित्सालयीन मानसशास्त्रज्ञ हे पद गेल्या १५ वर्षापासून, मुख्य प्रशासकीय अधिकारी पद मागील दीड वर्षापासून, अधिसेविका हे पद गेल्या १० वर्षापासून तर सहाय्यक अधिसेविका हे पद गेल्या ३ ते ४ वर्षापासून रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मनोरुग्णालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्यावर पडत असलेला अतिरिक्त कामाचा ताण कमी करण्यासाठी शासनाने सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२२-०१-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही आरोग्य सेवा आयुक्तालय व शासनस्तरावर सुरु आहे. मात्र उपलब्ध कार्यरत कर्मचाऱ्यांमार्फत रुग्णालयाचे कामकाज सुरळीत सुरु आहे.

---

## माहूर (जि.नांदेड) ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना जेवण मिळत नसल्याबाबत

**(४४) ६०७७ (१४-१२-२०२०) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहूर (जि.नांदेड) येथील ग्रामीण रुग्णालयात दिनांक २१ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास भर्ती करण्यात आलेल्या रुग्णांना जेवण देणे बंद असल्याने त्यांचे हाल होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तेथील रुग्णांना चहा, नाश्ता व जेवण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२५-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) ग्रामीण रुग्णालय, माहूर येथे प्रसुतीसाठी येणाऱ्या गरोदर मातांना जननी सुरक्षा कार्यक्रमांतर्गत मोफत आहार सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते. रुग्णालयात दाखल होणाऱ्या गरोदर मातांव्यतिरिक्त इतर रुग्णांना आहार सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता आयुक्तालयाच्यास्तरावरुन निविदा प्रक्रिया राबविण्यात येवून निविदा प्रक्रियेमध्ये निवड झालेल्या संस्थेव्दारे दिनांक ०१/०४/२०१९ पासून ग्रामीण रुग्णालय, माहूर या रुग्णालयात आहार सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. दिनांक २१/१०/२०२० रोजी कोणतीही पूर्वसूचना न देता सदर पुरवठादाराने ग्रामीण रुग्णालय माहूर येथील आहार सेवा बंद केल्यामुळे दिनांक २२/१०/२०२० च्या पत्रान्वये वरील आहार

पुरवठादारास रुग्णालयामध्ये तातडीने आहार सेवा सुरु करण्याबाबत कळविण्यात आले होते. दिनांक ३०/१०/२०२० पासून ग्रामीण रुग्णालय, माहूर येथे पूर्ववत आहार सेवा सुरु केली आहे. दिनांक २१/१०/२०२० ते दिनांक ३०/१०/२०२० या कालावधीत ग्रामीण रुग्णालय माहूर स्थानिक स्तरावरुन आहार सुविधा उपलब्ध करुन घेतल्याने रुग्णांची कोणतीही गैरसोय झाली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर येथील शासकीय रुग्णालयाचे बांधकाम निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(४५) ६०९० (१७-११-२०२०) श्री.प्रशांत परिचारक, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर येथील जुन्या पोलीस आयुक्तालय कार्यालय परिसरात १०० खाटांचे दोन शासकीय रुग्णालय मंजूर असून त्यांचे ४० टक्के बांधकाम झाले असताना उर्वरीत बांधकाम निधी अभावी प्रलंबित असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन रुग्णालयासाठी मंजूर असलेला रुपये ६० कोटी निधीपैकी रुपये १२ कोटी निधी देण्यात आला असून जिल्ह्यात कोरोना रुग्णांची संख्या वाढत असतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाला सार्वजनिक आरोग्य विभागाकडून उर्वरित रुपये ४८ कोटी निधी देण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने १०० खाटांच्या दोन रुग्णालयाचे बांधकाम वेळेत पूर्ण करण्यासाठी उर्वरित मंजूर निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२२-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

सोलापूर येथील १०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयाच्या बांधकामाच्या रुपये २०.३३ कोटी व १०० खाटांच्या स्त्री रुग्णालयाच्या रुपये २०.३३ कोटी अंदाजपत्रक व आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.
(३) व (४) जिल्हा रुग्णालयाच्या बांधकामासाठी मार्च, २०२० पर्यंत रुपये ४.४५ कोटी निधी खर्च झाला असून, सन २०२०-२०२१ मध्ये रुपये ५.०० कोटीची तरतूद करण्यात आली असून सदर निधी वितरित करण्यात आला आहे. तसेच स्त्री रुग्णालयाच्या बांधकामासाठी मार्च, २०२० पर्यंत ८.१८ कोटी निधी खर्च झाला असून सन २०२०-२०२१ करीता रुपये ७.०० कोटी तरतूद केली असून सदर निधी वितरित केला आहे.

---

## चिंचघरपाडा (ता.वाडा, जि.पालघर) येथील वडवली गावच्या हद्दीतील शेतीपिकांचे नुकसान होत असल्याबाबत

**(४६) ६१५० (०१-१२-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिंचघरपाडा (ता.वाडा, जि.पालघर) येथील वडवली गावच्या हद्दीतील शेतजमिनीलगत असलेल्या टाटा ॲल्युमिनियम कंपनीतून निघणारे सांडपाणी, धुर व दूषित वायुमुळे शेतीपिकांचे नुकसान होत असल्याने स्थानिक नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी तहसिलदार, वाडा यांच्याकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने प्रदूषणकारी कारखाना व इतर रासायनिक कारखाने यांना नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरीत नुकसान भरपाई देण्यात यावी, असे आदेश तहसिलदारांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तहसिलदारांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू प्रकरणातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना संबंधित कारखान्यांनी नुकसान भरपाई दिली नसल्यास सदरहू कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (२१-०१-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मौजे वडवली व चिंचघरपाडा, ता.वाडा, जि.पालघर येथे मे.टाटा अल्युमिनिअम कंपनी अस्तित्वात नसुन सदर ठिकाणी मे.एस.जे. इंडस्ट्रीज, वडवली व मे.सुपर मेटल कंपनी स्थित आहे.

तहसिलदार, वाडा यांनी दिनांक ०८/१०/२०२० रोजी उद्योजक व शेतकरी यांच्या संयुक्त बैठकीत संबंधित उद्योगामधून होणाऱ्या प्रदूषणामुळे शेतपिकांचे नुकसान होत असल्याने संबंधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत सूचित केले आहे.

(२) तहसिलदार, वाडा यांनी दिनांक ०२/१२/२०२० रोजी दिलेल्या आदेशानुसार नुकसानग्रस्त/बाधित शेतकऱ्यांपैकी भाई नारायण पाटील व मुकूंद धोंडू पाटील या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अदा केल्याबाबत कंपनी व्यवस्थापनाने १०० रुपये रकमेच्या स्टॅम्प पेपरवर तहसिलदार, वाडा यांना कळविले आहे.

(३) मौजे चिंचघरपाडा येथील शेतकऱ्यांची मौजे वडवली, ता.वाडा, जि.पालघर येथील उद्योगातुन होणाऱ्या प्रदूषणामुळे शेतीचे नुकसान झाल्याची तक्रार तहसिलदार, वाडा यांच्याकडून दिनांक ०४/०९/२०२० रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त झाली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक २८/०९/२०२० रोजी केलेल्या पाहणीमध्ये दोषी आढळलेल्या मे.सुपर मेटल वर्क्स, वडवली, ता.वाडा (ॲल्युमिनियम वितळविणे) या उद्योगास उत्पादन बंदचे आदेश देण्यात आलेले आहेत.

मे.एस.जे. इंडस्ट्रीज, वडवली, ता.वाडा या उद्योगास विना परवाना औद्योगिक उत्पादन सुरु केल्याच्या कारणास्तव महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक ३१/१२/२०१९ रोजी उत्पादन बंदीचे आदेश देण्यात आले

आहेत. तसेच सदर उद्योगाविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १३३ अन्वये कारवाई करणेबाबत तहसिलदार, वाडा यांनी दिनांक ०७/१२/२०२० रोजी जिल्हाधिकारी, पालघर यांना कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे कोळपे (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) गावाला लाभक्षेत्रात समाविष्ट करण्याबाबत

**(४७) ६१८७ (१४-१२-२०२०) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ.आखवणे व भोम (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) येथे बांधलेल्या अर्जुना प्रकल्पाचे काम सन २०१९-२०२० मध्ये पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू धरणामध्ये सन २०२० मध्ये पाण्याचा साठा पूर्ण क्षमतेने भरला असून त्याच्या लाभक्षेत्रात वैभववाडी तालुक्यातील कोणकोणत्या गावांचा समावेश करण्यात आला आहे त्यापैकी मौजे कोळपे या गावाला सामावून घेण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने मौजे कोळपे गावाला लाभक्षेत्रात समाविष्ट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२८-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.

सदर प्रकल्प अर्जुना नसून अरूणा आहे.

मौजे हेत ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग येथे अरुणा नदीवर प्रकल्पाचे काम प्रगतीत आहे. सन २०२०-२०२१ मध्ये माती धरणाचे उर्वरीत कामे पूर्ण करुन पूर्ण क्षमतेने पाणीसाठा निर्माण करण्याचे नियोजन आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

जून, २०२० मध्ये ९३.३७८ द.ल.घ.मी. पैकी ७१.६८ द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण करण्यात आलेला आहे. प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात वैभववाडी तालुक्यातील हेत, मांगवली, वेंगसर, उपळे, भुईबावडा, कुसूर, तिरवडे, सोनाळी, एडगांव, उंबडे, कोळपे, सांगुलवाडी, वायंबोशी, मेहबुबनगर, कुंभारवाडी अशा एकूण १५ गावाचा समावेश करण्यात आला आहे. प्रकल्पाच्या मंजूर प्रकल्प अहवालानुसार लाभक्षेत्रातील गावांमध्ये कोळपे गावाचा समावेश आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धर्माबाद (जि.नांदेड) तालुक्यात बाभळी बंधाऱ्यामुळे व अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

**(४८) ६२८१ (२३-११-२०२०) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोकली, रात्राळी, बाभळी, शेळगांव (ध), माष्टी पाटोदा व नदीकाठची इतर गावे (ता.धर्माबाद, जि.नांदेड) येथील ३६५ हेक्टर बाधित शेती असून सन २०१४ मध्ये शासनाकडून सर्व्हेक्षण करून जमीन संपादित करण्यात आली असून आजमितीस सदर शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बाभळी बंधाऱ्यासाठी शासनाने रुपये २२५ कोटी खर्च करुनही त्याचा शेतकऱ्यांना फायदा झाला नसून उलट बाभळी बंधाऱ्याच्या बॅकवॉटरमुळे परिसरातील अनेक गावातील शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले असतानाही त्याची भरपाई मिळाली नसल्याने दिनांक १० नोव्हेंबर, २०२० रोजी शेळगाव, माष्टी पाटोदा गावातील असंख्य शेतकऱ्यांनी गोदावरी नदीच्या पात्रात जलसमाधी घेण्याचा इशारा एका निवेदनाव्दारे तहसिलदार, धर्माबाद यांना दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शेतकऱ्यांना त्यांच्या संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला तसेच यावर्षी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांची नुकसान भरपाई न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, बाभळी बंधाऱ्याच्या बॅकवॉटरमुळे व अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई तसेच संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२८-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.

आजमितीस सदर बंधाऱ्याच्या बुडीत क्षेत्रातील कोणतीही जमीन संपादित केली नाही.
(२) बंधारा बांधकामासाठी रुपये २१८.७८ कोटी खर्च झाला परंतु मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार दिनांक २९ ऑक्टोबर नंतर बंधाऱ्याचे गेट टाकल्याने बंधारा पूर्ण क्षमतेने भरत नाही. त्यामुळे लाभक्षेत्रातील सिंचन क्षेत्र भिजत नसल्याने शेतकऱ्यांना फायदा होत नाही. बॅकवॉटरमुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान झालेले नाही. धर्माबाद तालुक्यातील असंख्य शेतकऱ्यांनी दिनांक १० नोव्हेंबर २०२० रोजी जलसमाधी घेण्याचे इशारा निवेदन दिले आहे, हे खरे आहे
(३) व (४) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार पाणीसाठा होत नसल्याने सद्य:स्थितीत भूसंपादन केले नाही त्यामुळे मोबदला देण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही. बाभळी बंधाऱ्याच्या बॅकवॉटरमुळे पिकांचे नुकसान झालेले नाही. संपादक संस्था कार्यकारी अभियंता, विष्णुपूरी प्रकल्प विभाग क्र.२, नांदेड यांनी बाभळी बंधाऱ्यांच्या बुडीत क्षेत्राबाबत जमीन संपादन करण्याबाबत एकही प्रकरण उपविभागीय अधिकारी, धर्माबाद यांच्याकडे सादर केलेले नाही. तसेच बुडीत क्षेत्रातील कोणतीही जमीन संपादित केलेली नसल्यामुळे जमिनीचा मोबदला तसेच नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न येत नाही. मात्र, माहे जून ते ऑक्टोबर, २०२० या कालावधीत अतिवृष्टी व पुरामुळे शेती पिकांचे नुकसान झाल्याने बाधित शेतकऱ्यांना मदत देण्याचा शासन निर्णय, महसूल व वन विभागामार्फत दिनांक ०९/११/२०२० रोजी पारित करण्यात

आलेला असून विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्यामार्फत जिल्हाधिकारी, नांदेड यांना रुपये २८२,५६,६७,०००/- (अक्षरी रुपये दोनशे ब्याऐंशी कोटी छप्पन लक्ष सदुसष्ट हजार फक्त) एवढा मदत निधी वितरित करण्यात आला आहे. त्यापैकी धर्माबाद तालुक्यातील २३६८७ बाधित शेतकऱ्यांना रुपये १०,२३,५९,९३२/- इतका निधी वितरित करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे शहरातील वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या कामाबाबत

**(४९) ४६५०२ (१२-०७-२०१९) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे शहरातील वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या कामास शासनाने माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे तसेच योजनेवर किती खर्च अपेक्षित आहे, उक्त योजनेच्या कामास प्रत्यक्षात केव्हा सुरुवात करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-०१-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ठाणे वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्प हा एकूण २९ कि.मी. लांबीचा (२६ कि.मी. उन्नत व ३ कि.मी. भुयारी) व २२ स्थानके असलेला, २० उन्नत व २ भुमीगत असलेल्या मेट्रो मार्ग असून, सदर प्रकल्पाची मार्गिका ठाणे रेल्वे स्थानक, प्रस्तावित कोपरी रेल्वे स्थानक, वागळे इस्टेट परिसर, उपवन तलाव, पाटलीपाडा, डोंगरीपाडा, वाघबीळ, हिरानंदानी, कोलशेत, राबोडी, शिवाजीनगर याभागातून वर्तुळाकार मार्गाने प्रस्तावित आहे.

राज्य शासनाने शासन निर्णय, दिनांक ८ मार्च, २०१९ अन्वये सदर प्रकल्पाची अंमलबजावणी ठाणे महानगरपालिकेमार्फत करण्यास मान्यता दिली आहे. सविस्तर प्रकल्पानुसार प्रकल्पावर एकूण १३९५ कोटी (जमिनीची किंमत आणि करासहीत) एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर प्रकल्पाचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेस्तव माहे एप्रिल, २०१९ रोजी पाठविण्यात आला असून, केंद्र शासनाच्या मान्यतेनंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात होणे अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे-भिवंडी-कल्याण पट्टयातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी मेट्रो रेल्वेचा मार्ग डबल-डेकर करण्याबाबत

**(५०) ४७९१५ (१२-०७-२०१९) ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-भिवंडी-कल्याण पट्टयातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी नागपूर मेट्रो प्रकल्पाच्या धर्तीवर मेट्रो रेल्वेचा मार्ग डबल-डेकर करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-०१-२०२१) :** (१) व (२) ठाणे-भिवंडी-कल्याण पट्टयातील प्रवासी वाहतूक समस्या सोडविण्यासाठी मुंबई मेट्रो मार्ग-५ या ठाणे-भिवंडी-कल्याण या २४.९० कि.मी.चा पूर्णत: उन्नत मेट्रो रेल्वे मार्गिकेची एमएमआरडीएकडून अंमलबजावणी करण्यात येत आहे. ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो मार्गिकेवर धामणकर नाका उड्डाणपुल येथे खालील पातळीवर रस्ता व वरील पातळीवर मेट्रो अशा व्दिस्तरीय संरचनेनुसार बांधकाम करण्याचे नियोजित आहे.

(३) व (४) सदर प्रकल्पातील कापुरबावडी, ठाणे ते धामणकर नाका, भिवंडी या १२ कि.मी. मार्गाच्या स्थापत्य कामाकरीता (पॅकेज क्र. सीए-२८) मे.ॲफकॉनस् इन्फ्रास्ट्रक्चर लि. या कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्यामार्फत प्रकल्पाची प्राथमिक कामे उदा. सर्वेक्षण, सेवावाहिन्याचा शोध घेणे, संरेखन अंतिम करणे, माती चाचणी इत्यादीची कामे प्रगतीपथावर आहेत. सदर प्रकल्पाकरीता मे.कन्सोरटीयम ऑफ सिस्त्रा-सीजीइ-एसएमसीआयपीएल व मे.कन्सोरटीयम ऑफ मे.वेरीटास आर्किटेक्टस, एसडीएन., बीएचडी., अर्कोहम कन्सल्ट प्रा.लि. यांची अनुक्रमे सामान्य सल्लागार व सविस्तर संकल्पचित्र सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.